# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, २रा मजला (दक्षिण कक्ष), बेलापूर, नवी मुंबई -४००६१४

दूरध्वनी : ०२२-२२०२६५४९, २२८३५२४७,२२०२५३५४

ई-मेल : ms.mjp२०२२@gmail.com, mjpcao@gmail.com


जा.क्र.मजीप्रा-२०२६/प्र.क्र.२०/बैठक-१६०/आ-४, दिनांक :- ०८ ऑक्टोबर, २०२६

**प्रति,**

मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाच्या उपाध्यक्षा, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाच्या उपाध्यक्षा, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (व्यय) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

विषय :- दिनांक १६ सप्टेंबर, २०२६ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १६०व्या बैठकीचे इतिवृत्त.

संदर्भ :- प्राधिकरणाचे समक्रमांकित पत्र दिनांक ०७.०९.२०२६

महोदय/महोदया,

दिनांक १६ सप्टेंबर, २०२६ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १६०व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

मान्यतेने.

आपला विश्वासू,

(गजानन गुरव)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

सोबत :- इतिवृत्ताची प्रत

**प्रत :** मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई, यांचे माहितीसाठी.

सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

...२/-

**प्रत: माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.**

- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.
- उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/ छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/नागपूर.
- अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, म.नि.सं. व सं.कक्ष, मित्तल चेंबर्स, मुंबई.
- उप मुख्य लेखा अधिकारी (१/२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
- उप अभियंता (आय.टी.सेल), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
- उप अभियंता (आ-९), स्थावर मालमत्ता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नवी मुंबई.
- कायदा व कामगार अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सिडको भवन, नवी मुंबई.
- कार्यासन अधिकारी (आस्था-३), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नवी मुंबई.

सोबतचे इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबींवर योग्य ती कार्यवाही त्वरित करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल २ आठवडयामध्ये सादर करावा.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १६०व्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १६०वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.गुलाबराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली मा.मंत्री महोदय यांचे दालन क्र.४०२, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई येथे बुधवार दिनांक १६ सप्टेंबर, २०२६ सकाळी ११.०० वाजता संपन्न झाली. या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री.गुलाबराव पाटील, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे संचालक मंडळाचे पदसिध्द अध्यक्ष.

२) मा.श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या पदसिध्द उपाध्यक्षा.

३) श्री.पराग जैन-नैनुटिया, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई तथा प्राधिकरणाचे संचालक मंडळाचे सदस्य

४) श्री.अमगोथू श्री रंगा नायक, सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई तथा प्राधिकरणाचे संचालक मंडळाचे सदस्य सचिव

या व्यतिरिक्त सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री. गजानन गुरव, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई.

२) श्री. दिपक शेलार, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई

३) श्रीमती स्वाती ताडफळे, संचालक (वित्त) प्रभारी, म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

४) श्री.अजय सिंह, अधीक्षक अभियंता (मु.), म.जी.प्रा.मुंबई.

५) श्री.मनोज नुक्ती, अवर सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय मुंबई.

७) श्री.विजय चव्हाण, वरिष्ठ लेखा अधिकारी, म.जी.प्रा.

सर्व प्रथम सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. १:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या च्या १५९व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १५९वी बैठक दिनांक ११ मार्च, २०२६ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १५९व्या बैठकीच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता दिली.

अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. २:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १५९व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची दिनांक ११ मार्च, २०२६ रोजी संपन्न झालेल्या १५९व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १५९व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :-** नागपूर पेरी अर्बन (१२ गावे) प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता. जि. नागपूर - योजनेत समाविष्ट नगरपंचायत/ ग्रामपंचायतीला ठोक तत्वावर पाणी पुरवठा करणेबाबत.

- **प्रकरणाची माहिती:-**

नागपूर पेरी अर्बन (१२ गांवे) प्रादेशिक पाणी पुरवठा योजना मजीप्राच्या मालकीची असून सदर योजनेची देखभाल दुरूस्ती मजीप्रा मार्फत करण्यात येते. उपरोक्त योजनेत (१२ गावे) समाविष्ट असून सदर गावांना या योजनेतून किरकोळ तत्वावर पाणी पुरवठा मजीप्रामार्फत केला जातो. या योजनेतील सर्व शहरे / गांवे नागपूर महानगर पालिकेच्या हद्दीला लागून आहेत. नागपूर महानगर पालिका व नागपूर पेरी अर्बनच्या दरामध्ये मोठी तफावत असल्याने ग्राहक, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी यांच्या तक्रारी असून पाण्याचे दर महानगरपालिकेच्या दराएवढे करण्याची मागणी मा.ना.श्री चंद्रशेखरजी बावनकुळे, महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपूर यांनी दि.२३/०१/२०२५ रोजी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांचे कार्यालयात नागपूर पेरी अर्बनच्या दराबाबत घेण्यात आलेल्या आढावा सभेत केली आहे. त्यानुषंगाने, मुख्य अभियंता, मजीप्रा, नागपूर यांनी पुढीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमा अंतर्गत नागपूर पेरी अर्बन १२ गांवे व नागपूर सुधार प्रन्यास यांच्या हद्दीतील ९ गावे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना ता.जि. नागपूर या योजनेची संक्षिप्त माहिती खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नांव | :- | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमा अंतर्गत नागपूर पेरी अर्बन (१२ गांवे) व नासुप्र (९ गावे) प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता.जि. नागपूर. |
| २. | प्रशासकीय मंजूरी | :- | शा. नि. क्र.ग्रापापु-२०१२/प्र.क्र./७३/पापु-१३, दि.३१.०१.२०१४. |
| ३. | तांत्रिक मंजूरी | :- | पत्र क्र. म.नि.सं.सं.कक्ष/ग्रामीण/४८ दि.१३/०१/२०१४ |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| ४. | योजनेची किंमत | :- | रू. २३२.७४ कोटी |
|---|---|---|---|
| | | | शासकीय अनुदान — रु.१२७८२.४० लक्ष |
| | | | नागपूर सुधार प्रन्यास यांचा भांडवली हिस्सा — रु.१०४९१.७९ लक्ष |
| | | | योजनेची एकूण ढोबळ किंमत — रु.२३२७४.१९ लक्ष |

सदर पाणी पुरवठा योजनेत समाविष्ट गावे व योजनेची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:

१. पाणी पुरवठा केंद्राचे नाव :- नागपूर पेरी अर्बन (१२ गांवे)

२. योजनेत समाविष्ट गांवे :- **नगर पंचायत बेसा -**
१) बेसा २) बेलतरोडी ३) घोगली ४) पिपळा
**नगर पंचायत बहादुरा-**
१) बहादुरा २) गोन्हीसीम ३) खरबी
**नगर पंचायत बिडगांव-**
१) बिडगांव २) तरोडी
**ग्रामपंचायत शंकरपूर -**
१) शंकरपूर
**ग्रामपंचायत हुडकेश्वर -**
१) हुडकेश्वर (खु)
**ग्रामपंचायत कापसी -**
१) कापसी (खु)
**एकूण १२ गांवे**

३. नागपूर सुधार प्रन्यास ची गावे :- नागपूर सुधार प्रन्यास (९ गांवे)
**ता.नागपूर**
१) पांजरी २) वरोडा ३) रुई ४) गवसी
**ता. हिंगणा**
५) खडका ६) किरमीटी ७) शिवमडका ८) सुमठाणा ९) पांजरी
उपरोक्त ९ गावांस ठोक स्वरुपात योजनेतून पाणी पुरवठा करणे प्रस्तावित आहे.

४. योजनेचा उदभव :- निम्न वेणा प्रकल्पाचे वडगांव जलाशय

५. पाणी आरक्षण :- १५.०० द.ल.घ.मी. पाणी आरक्षण
जलसंपदा विभागाचे ९ ऑक्टोबर २०१२ च्या शासन निर्णयाव्दारे मंजूर

**योजनेत समाविष्ट लोकसंख्या व पाणी मागणी विवरण:**

| अ.क्र. | तपशील | २०१४ प्रमाणे | २०२९ प्रमाणे |
|---|---|---|---|
| १. | मजीप्रा लोकसंख्या (१२ गावे) | ५९५०५ | १६१२४८ |
| २. | ना.सु.प्र. लोकसंख्या (९ गांवे) | ३१०००० | ३१०००० |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | |
|---|---|---|---|
| | **लोकसंख्या (एकूण २१ गांवे)** | **३६९५०५** | **४७१२४८** |
| ३. | दरडोई पाणी पुरवठा | **७० LPCD** | **७० LPCD** |
| ४. | मजीप्रा पाण्याची मागणी (१२ गावे) | ५.०३ द.ल.लि. | १४.७० द.ल.लि |
| ५. | पाण्याची मागणी (ना.सु.प्र.) | २५.५३ द.ल.लि. | २५.५३ द.ल.लि. |
| ६. | **एकूण पाण्याची मागणी** | **३०.५६ द.ल.लि.** | **४०.२३ द.ल.लि.** |

**महानगर पालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरांचा तुलनात्मक तक्ता:**

| **नागपूर महानगर पालिका दर आकारणी (शहरी) प्रति युनिट घरगुती प्रति हजार लिटर** (KL) (दि.०१.०४.२०२३ **पासून**) | **नागपूर पेरी अर्बन योजना दर आकारणी प्रति युनिट घरगुती प्रति हजार लिटर** (KL) (दि.०१.०७.२०२३ **पासून**) | **नागपूर पेरी अर्बन योजना दर आकारणी प्रति युनिट बिगर घरगुती प्रति हजार लिटर** (KL) (दि.०१.०७.२०२३ **पासून**) |
|---|---|---|
| १) १ ते २० पर्यंत रू. ८.९९<br>२) २१ ते ३० पर्यंत रू. १४.३७<br>३) ३१ ते ८० पर्यंत रू. १९.७६<br>४) ८० युनिटवर रू. २६.९५ | १) ० ते १५ पर्यंत रू. २०.९०<br>२) १५ ते २५ पर्यंत रू. ३२.२३<br>३) २५ युनिटवर रू. ४३.८९ | रू.९६.६९ प्रति १००० लि.<br>रू.४०.२६ प्रति १००० लि. (संस्थेकरिता) |

योजनेवर प्रत्यक्ष येणाऱ्या वार्षिक खर्चानुसार मजीप्रा व ग्रामपंचायत / नगर पंचायतीवर येणारा वार्षिक देखभाल दुरुस्तीच्या खर्चाचा गोषवारा:

**ABSTRACT**

| **Sr. No.** | **Particulars** | | **Amount (Rs.in Lakhs)** | |
|---|---|---|---|---|
| | | | **Upto ESR** | **For Distribution** |
| 1 | Establishment Charges, Rectification of leakages, Miscellaneous Maintenance etc. | :- | **150.00** | **145.00** |
| 2 | Raw Water Charges | :- | 54.00 | 0.00 |
| 3 | Chemical | :- | 20.00 | 0.00 |
| 4 | Electricity Bill | :- | 780.00 | 0.00 |
| 5 | Mechanical O & M works | :- | 65.00 | 0.00 |
| | **Total** | :- | **1069.00** | **145.00** |

योजनेच्या प्रशासकीय मान्यतेच्या अटी व शर्ती नमुद केल्यानुसार, सदर योजना मजीप्रा मार्फत राबवायची आहे. त्याकरिता मजीप्रा मार्फत पाणीपट्टी वसुल करुन तसेच नागपूर सुधार प्रन्यास क्षेत्रासाठी ठोक तत्वावर पाणी पुरवठा करणे त्याबदल्यात नासुप्र यांनी आवश्यक दराने पाणी पट्टीचा हिस्सा मजीप्रास उपलब्ध करणे आवश्यक आहे.

प्रस्तावानुसार पाण्याच्या टाकीपर्यंत ठोक तत्वावर पाणी पुरवठा करण्याकरिता मजीप्राला रू.१०६९.०० लक्ष एवढा खर्च येतो. तसेच ग्रामपंचायत/नगरपंचायतीला वितरण व्यवस्थेची देखभाल दुरूस्ती, देयक तयार करणे व वसूलीकरिता रू.१४५.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात एकूण ११०४६.३५ द.ल.लि. इतके कच्चे पाणी उचलण्यात आले आहे. योजनेवर एकूण व्यय २२% असून उंच जलकुंभांपर्यंत सरासरी १०% व्यय गृहीत धरून एकूण ९९४१.१८ द.ल.लि. पाणी पोहोचविण्यात आले आहे.

सद्यस्थितीत, सर्व ग्रामपंचायती/नगरपंचायतींच्या मासिक पाणी वापराची टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | मासिक पाण्याचा वापर थेट उंच टाकीपर्यंत (KL) | मासिक पाणी वापराची टक्केवारी | प्रस्तावित पाणी दर रु/कि.लि. | मासिक आकारणी रु. लक्षामध्ये (Base Price) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बेसा | १८५८१०४ | १८.६९ | १०.७५ | १९९.७५ |
| २ | बेलतरोडी | १५७८७४० | १५.८८ | १०.७५ | १६९.७१ |
| ३ | पिपळा | १४२७६३० | १४.३६ | १०.७५ | १५३.४७ |
| ४ | घोगली | १७५९७० | १.७७ | १०.७५ | १८.९२ |
| ५ | शंकरपूर | ८४५०० | ०.८५ | १०.७५ | ९.०८ |
| ६ | बहादूरा | १२५८६१० | १२.६६ | १०.७५ | १३५.३० |
| ७ | हुडकेश्वर | १४९२० | ०.१५ | १०.७५ | १.६० |
| ८ | गोन्ही सीम | ९३९४९० | ९.४५ | १०.७५ | १०१.०० |
| ९ | खरबी | १९०३८४० | १९.१५ | १०.७५ | २०४.६६ |
| १० | कापसी | १३८२०० | १.३९ | १०.७५ | १४.८६ |
| ११ | बीडगाव | ३८३७५० | ३.८६ | १०.७५ | ४१.२५ |
| १२ | तरोडी | १७७९६० | १.७९ | १०.७५ | १९.१३ |
| | **एकूण** | ९९४१७१४ | **१००** | | **१०६८.७३** |
| | **एकूण** | **९९४१.७२ ML** | | | |

त्यानुसार प्रस्तावित पाणीदर खालीलप्रमाणे आहे.

## संभावित पाणी दराबाबत तुलनात्मक तक्ता

| अ. क्र. | बाब | खर्च (रू.लक्ष) | percentage recovery | Base Price Rs./KL | Variable Price Rs./KL |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाण्याच्या उंच टाकीपर्यंत देखभाल दुरूस्ती खर्च | १०६९.०० | १००% | १०.७५ | As per actual expenses done for emergency maintenance. |
| | | | ९०% | ११.९४ | |
| | | | ८०% | १३.४४ | |
| | | | ७५% | १४.३३ | |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

पाण्याच्या टाकीपर्यंत ठोक स्वरूपात संबंधित नगर पंचायत/ग्रामपंचायतला पाणी पुरवठा करुन **पूर्ण वसुलीची शक्यता गृहीत धरून** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला पाण्याचा दर **रु.१०.७५ प्रति हजार लिटर** इतका येत आहे. तथापि, **ग्रामपंचायती/नगरपंचायतीच्या थकबाकीप्रमाणे** उपरोक्त प्रमाणे दर लागू करण्यात येईल.

सदर दर सन २०२५-२६ चे मंजूर अंदाजपत्रक व प्रत्यक्ष झालेल्या खर्चाला गृहीत धरून घेण्यात आलेले आहे. सदर दरात किरकोळ दुरुस्त्यांच्या खर्चाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. तथापि, भविष्यात योजनेवर मोठा आकस्मिक खर्च जसे योजनेचे पंप बदलणे, पाईपलाईन बदलणे, पाईपलाईनवर उद्भवलेली मोठ्या स्वरुपाची गळती, शिर्षकामे अथवा जलशुद्धीकरण केंद्रातील उपांगांची मोठ्या प्रमाणावरील आकस्मिक दुरुस्ती इ. उद्भवल्यास सदर खर्चाची प्रतीपूर्ती पाणी मागणीच्या प्रमाणात प्रत्येक यंत्रणेकडून देयकातून करणे आवश्यक आहे. तसेच भविष्यात वाढणारे ग्राहक व इतर खर्च गृहीत धरून दरवाढ करणे आवश्यक आहे. तथापि, सध्या करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठ्याऐवजी ठोक दरानुसार पाणी पुरवठा करण्याविषयीचा ठराव सर्व संबंधित ग्रामपंचायत/नगरपंचायतींकडून प्राप्त होणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत तीन नगरपंचायती (बेसा बिडगांव-तरोडी व बहादुरा) यांचेकडून ठराव प्राप्त झाला असून उर्वरीत ग्रामपंचायत कडून ठराव प्राप्त होणे बाकी आहे.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आले.

**प्रस्ताव :-**

मा.ना.श्री चंद्रशेखरजी बावनकुळे, महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपूर यांनी दि.२३/०१/२०२५ रोजी मुख्य अभियंता, मजीप्रा, नागपूर यांचे कार्यालयात नागपूर पेरी अर्बनच्या दराबाबत आढावा सभेनुसार दिलेल्या निर्देशानुसार नागपूर पेरी अर्बन पाणी (१२ गांवे) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून नगर पंचायत/ग्रामपंचायतीला ठोक तत्वावर पाणी पुरवठा करण्याबाबत झालेल्या चर्चेत दिलेले निर्देशानुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाण्याच्या टाकीपर्यंत ठोक स्वरूपात संबंधित नगर पंचायत / ग्रामपंचायतला पाणी पुरवठा करण्यासाठी उपरोक्तप्रमाणे पाण्याचे दर आकारण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्याचे प्रस्तावित करण्यात आले.

| | |
|---|---|
| १ | **नागपूर पेरी अर्बन (१२ गावे) व नासुप्र एकूण ९ गावे योजनेतून यापुढे रिटेल पध्दती ऐवजी ठोक पध्दतीने पाणी पुरवठा करण्यात यावा.** यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिलेले पाण्याचे देयक, नगर पंचायत / ग्रामपंचायत यांनी दर महिन्याला १०० टक्के भरणे बंधनकारक राहील. |
| २. | देयके थकविणाऱ्या यंत्रणेकरिता थकीत देयकांच्या (विलंब शुल्क वजा करून मागील थकबाकीसह) रक्कमेकरिता १% प्रतिमाह इतके विलंब शुल्क आकारण्यात येईल. त्याचप्रमाणे संबंधित यंत्रणेने त्यांची थकबाकी ३ महिन्यापर्यंत दंडासह न भरल्यास ५०% पाणी कपात व ६ महिन्यापर्यंत दंडासह न भरण्यास पूर्ण पाणी कपात करण्यात यावी व जोपर्यंत संपूर्ण थकबाकी वसूल होत नाही तोपर्यंत पाणी पुरवठा पुन:श्च सुरु करण्यात येवू नये. |
| ३. | नगर पंचायत / ग्रामपंचायत यांनी १ वर्षापर्यंत नियमित देयक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अदा न केल्यास, शासनामार्फत नगर पंचायत / ग्रामपंचायतला वितरित होणाऱ्या निधी / अनुदानातून वळती |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | |
|---|---|
| | करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास भरण्यास संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची मान्यता असेल. त्यादृष्टीने अटीचा समावेश करारनाम्यामध्ये करण्यात येईल. |
| ४. | सदर दर सन २०२५-२६ चे मंजूर अंदाजपत्रक व प्रत्यक्ष झालेल्या खर्चाला गृहीत धरून घेण्यात आलेले आहेत. भविष्यात खर्चामध्ये होणारी वाढ/बचत गृहीत धरून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत दरवर्षी ठोक स्वरुपातील पाण्याचा दर ठरवला जाईल. त्यानुसार दरमहा वापरण्यात आलेल्या पाण्याच्या परिमाणावर आकारण्यात येणारे देयक अदा करणे संबंधित ग्रामपंचायत / नगरपंचायत यांना बंधनकारक राहील. |
| ५. | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ग्राहकांकडील थकबाकी वसूलीसाठी संबंधित ग्रामपंचायत / नगरपंचायत हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सहकार्य करतील. |
| ६. | योजनेत समाविष्ट सर्व गावांना यापुढे ठोक स्वरुपात पाणी पुरवठा करावयाचा असल्याने संबंधित गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या उंच जलकुंभाला स्मार्ट पद्धतीचे फ्लो मीटर बसविणे बंधनकारक राहील. NMRDA मार्फत करण्यात येणाऱ्या कामामध्ये काही कामे ही मजीप्रा मार्फत चालवण्यात येत असलेल्या योजनेचीही सामायिक आहेत व त्या योजनेतूनच NMRDA मार्फत काम सुरू असलेल्या गावांना पाणी पुरवठा करणे अपेक्षित असल्याने अस्तित्वातील नागपूर पेरी अर्बन प्रादेशिक पाणी पुरवठा योजना दुरुस्तीचे (Retro-fitting), स्वयंचलित यंत्रणा (Automation) व टाक्यांना लावावे लागणारे फ्लो मीटरची कामे NMRDA मार्फत प्राधान्याने घेण्यात यावीत. उर्वरीत ग्रामपंचायत/नगरपंचायत यांनी आवश्यक असणारे फ्लो मीटर पुरवठा करणे, बसविणे व सदर फ्लो मीटर IoT मध्ये Integrate करुन घेणे इ.चा खर्च करावा. अन्यथा, सदर खर्च मजीप्रामार्फत करण्यात येईल व सदर खर्चाची वसुली सर्व संबंधित ग्रामपंचायत/नगरपंचायतीकडून वसूल करण्यात येईल. तसेच सदर सर्व फ्लो मीटर्स IoT पद्धतीत Integrate करून घेणे बंधनकारक आहे. |
| ७. | आता प्रस्तावित दरामध्ये किरकोळ दुरुस्त्यांच्या खर्चाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. तथापि, भविष्यात योजनेवर मोठा आकस्मिक खर्च जसे योजनेचे पंप बदलणे, पाईपलाईन बदलणे, पाईपलाईनवर उद्भवलेली मोठ्या स्वरुपाची गळती, शिर्षकामे अथवा जलशुद्धीकरण केंद्रातील उपांगांची मोठ्या प्रमाणावरील आकस्मिक दुरुस्ती इ. उद्भवल्यास सदर खर्च पाणी मागणीच्या प्रमाणात प्रत्येक यंत्रणेकडून देयकातुन वसूल करण्यात येईल या विषयीची अट करारनाम्यात अंतर्भुत करण्यात यावी. |
| ८. | सध्या करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठ्याऐवजी ठोक दरानुसार पाणी पुरवठा करण्यास तयार असल्याविषयीचा विषयीचा ठराव सर्व संबंधित ग्रामपंचायत / नगरपंचायतींकडून प्राप्त झाल्यानंतरच सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात यावी. |
| ९. | ज्या ग्रामपंचायती / नगरपंचायतींकडून ठोक स्वरुपात पाणी पुरवठा करणेबाबत ठराव प्राप्त होणार नाहीत व ज्या ग्रामपंचायती / नगरपंचायती ठोक पाणी पुरवठा करणेबाबत मजीप्रा सोबत विहीत नमुन्यातील रीतसर करारनामा करणार नाहीत अशा ग्रामपंचायती/ नगर पंचायतींना सद्यस्थितीत सुरु असलेल्या किरकोळ (Retail) पद्धतीचा पाणी पुरवठा पुढेही सुरु राहील व त्यासाठी मजीप्रामार्फत किरकोळ (Retail) पाणी पुरवठ्यासाठी अधिसूचनेद्वारे जे पाणी दर ठरविण्यात येतील ते लागू राहतील. |
| १०. | ठोक स्वरूपात पाणी पुरवठा करणेबाबत संबंधित ग्रामपंचायत व नगर पंचायत हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासोबत विहीत नमुन्यातील रितसर करारनामा करतील. सदर करारनाम्यात उपरोक्त सर्व अटींचा अंतर्भाव करून अंतिम करारनामा मजीप्रा व सर्व संबंधित ग्रामपंचायत/ नगरपंचायती यांचेशी करण्यात येईल. |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

उपरोक्तप्रमाणे चर्चा होऊन पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला .

**ठराव -:**

असा ठराव करण्यात येतो की, उपरोक्त प्रस्ताव व त्याचबरोबर खालील नमूद मुद्दयांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची थकबाकीबाबत एकवेळ (one time Settlement) तडजोड करण्याच्या अनुषंगाने नगरपंचायत व ग्रामपंचायत यांचे सोबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

२. प्रस्तावाप्रमाणे ठोक तत्वानुसार चालू पाणीपट्टी संबंधित नगरपंचायत व ग्रामपंचायत यांनी वसूल करून मजीप्रास जमा करण्याकरिता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नगरपंचायत/ग्रामपंचायत यांनी संयुक्त इस्क्रो (ESCROW) खाते उघडण्यात यावे.

३. उपरोक्त प्रस्तावानुसार, योजनेच्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीमध्ये विद्युत देयकापोटीचा खर्च कमी करण्याच्या दृष्टीने सौरऊर्जा आधारित प्रकल्प उभा करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी व त्याकरिता लागणारी जमीन महसुल विभागाकडून उपलब्ध करून घ्यावी. सदर सौरऊर्जा प्रकल्प सार्वजनिक - खाजगी भागीदारी (PPP मॉडेल) तत्वावर उभारण्यात यावा.

४. योजनेत समाविष्ट सर्व गावांना यापुढे ठोक स्वरुपात पाणी पुरवठा करावयाचा असल्याने संबंधित गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या उंच जलकुंभाला स्मार्ट पद्धतीचे फ्लो मीटर बसविणे बंधनकारक राहील (NMRDA मार्फत करण्यात येणाऱ्या कामामध्ये काही कामे ही मजीप्रा मार्फत चालवण्यात येत असलेल्या योजनेचीही सामायिक आहेत). उर्वरीत ग्रामपंचायत/नगरपंचायत यांनी आवश्यक असणारे फ्लो मीटर पुरवठा करणे, बसविणे व सदर फ्लो मीटर IoT मध्ये Integrate करुन घेणे इ.चा खर्च करावा. अन्यथा, सदर खर्च मजीप्रामार्फत करण्यात येईल व सदर खर्चाची वसुली नगरपंचायत/ ग्रामपंचायत यांचेकडून समान हप्त्यामध्ये वसूल करण्यात येईल. तसेच सदर सर्व फ्लो मीटर्स IoT पद्धतीत Integrate करावीत.

५. प्रस्तावित करण्यात आलेल्या दरामध्ये Fix Cost ( जसे दैनंदिन देखभाल व दुरुस्ती, कच्चे पाणी, विद्युत व रसायने इ.) खर्चाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. तथापि, भविष्यात योजनेवर Variable Cost ( जसे मोठा आकस्मिक खर्च - योजनेचे पंप बदलणे, पाईपलाईन बदलणे, पाईपलाईनवर उद्भवलेली मोठ्या स्वरुपाची गळती, शिर्षकामे अथवा जलशुद्धीकरण केंद्रातील उपांगांची मोठ्या प्रमाणावरील आकस्मिक दुरुस्ती इ.) उद्भवल्यास सदर खर्च DPDC/Mining Fund यामधुन करण्याकरीता संबंधित यंत्रणेकडे प्रस्ताव सादर करावा. त्यातुन खर्चाकरीता निधी उपलब्ध न झाल्यास सदर खर्च पाणी मागणीच्या प्रमाणात संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या देयकातुन वसूल करण्यात येईल या विषयीची अट करारनाम्यात अंतर्भुत करण्यात यावी.

६. भविष्यात योजनेच्या देखभाल दुरुस्तीच्या खर्चामध्ये होणारी वाढ/बचत गृहीत धरून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत दरवर्षी ठोक स्वरुपातील पाण्याचा दर ठरवला जाईल. त्यानुसार दरमहा वापरण्यात

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

आलेल्या पाण्याच्या परिमाणावर आकारण्यात येणारे देयक अदा करणे संबंधित ग्रामपंचायत / नगरपंचायत यांना बंधनकारक राहील.

७. मूळ नागपूर पेरी अर्बन योजना सन २०२९ च्या प्रकल्पित लोकसंख्येकरिता व ७० लिटर/दिन/माणशी नुसार आखण्यात आली होती. सद्यस्थितीत योजनेतील समाविष्ट १२ गावांपैकी ९ गावे ३ नगर पंचायतीमध्ये रुपांतरित झाली असून, त्यांचेकरिता नागरी निकषाप्रमाणे १३५ लिटर/दिन/माणशी मागणी लक्षात घेऊन त्यादृष्टीने अस्तित्वातील योजनेद्वारे शक्य तेवढा शहराकरिता नियोजन करावे. तसेच उर्वरित शहरे /गावांकरिता स्वतंत्र पेरी अर्बन टप्पा-२ योजनेचे नियोजन करण्यात यावेत.

८. सदरील नियोजन करताना NMRDA/ NIT मार्फत प्रगतीपथावर/नियोजित असलेल्या पाणी पुरवठ्याच्या कामांमध्ये अतिव्याप्त (Overlap) होणार नाही याची क्षेत्रीय कार्यालयाने काळजी घ्यावी.

त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.४ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीची पुनर्रचना करणेबाबत.

**संदर्भ :** १. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.०३.०६.१९९८ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या ८० व्या बैठकीचे इतिवृत्त.

२. मा.मंत्री, पा.पु. व स्व वि तथा अध्यक्ष, मजीप्रा यांची मान्यता असलेली या कार्यालयाची टिप्पणी दि.२२.०५.२०२६.

३. कार्यालयीन आदेश क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/४१३, दि.२६.०५.२०२६.

**अ) प्रकरणाची माहिती:-**

- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राज्यातील ग्रामीण व नागरी भागासाठी शासनाच्या धोरणानुसार पाणी पुरवठा व मलनि:स्सारण योजनांचे सर्व्हेक्षण व प्रकल्प अहवाल तयार करण्यात येतात. सदर प्रकल्प अहवालाची तपासणी करुन त्यास सक्षम अधिकाऱ्याकडून तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात येते. तद्नंतर सदर प्रकल्प अहवाल प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर केले जातात. शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प अहवालांचे निविदा प्रपत्र तयार करुन त्यास सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता घेण्यात येते. तद्नंतर शासनाच्या निविदाबाबतच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार तथा शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या निविदांबाबतच्या मार्गदर्शक सूचनानुसार सदर प्रकल्पांची निविदा सूचना प्रसिध्दीस देऊन निविदा प्रक्रिया राबविण्यात येते व कंत्राटदाराकडून देकार मागविण्यात येतात. सदर निविदांना कंत्राटदाराकडून प्राप्त होणाऱ्या प्रतिसादानुसार प्राप्त देकारापैकी न्युनत्तम देकारानुसार निविदांचे मुल्यांकन करुन निविदा प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येतो. सदर न्युनत्तम देकारास सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेनंतर कंत्राटदारास कार्यादेश देऊन प्रकल्पाची काम सुरु करण्यात येतात.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

- प्रकल्पाच्या निविदा किंमतीनुसार, निविदा मंजूरीचे अधिकार मजीप्रा परिपत्रक क्र.८६, दि.२१.०५.२००३ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार रु.५०० लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या तसेच ५% पेक्षा जास्त अधिक्य असणाऱ्या निविदा मंजूरीचे अधिकार मजीप्राच्या मा.निविदा समितीस प्रदान करण्यात आले आहेत.
- मजीप्राच्या मा.संचालक मंडळाच्या दि.०३.०६.१९९८ रोजी संपन्न झालेल्या ८० व्या बैठकीत कार्यक्रम बाब क्र.३ अन्वये पुढीलप्रमाणे निविदा समिती गठीत करण्यास मान्यता प्रदान केली आहे.

| | |
|---|---|
| १. | मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| २. | मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ३. | अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ४. | श्री.सुरेश पटवर्धन, सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण. |
| ५. | सदस्य सचिव (प्रशासन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण. |
| ६. | सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण. |

**ब)** मा.संचालक मंडळाच्या दि.०३.०६.१९९८ रोजी झालेल्या ८० व्या बैठकीत स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीची पुढीलप्रमाणे पुनर्रचना करण्याचे प्रस्तावित आले .

| | | |
|---|---|---|
| १. | मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष | अध्यक्ष |
| २. | मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष | उपाध्यक्ष |
| ३. | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य |
| ४. | सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| ५. | संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| ६. | ज्या विभागीय स्तरावरील निविदा स्विकृत करावयाचे प्रस्तावित आहे, त्या विभागाचे संबंधित मुख्य अभियंता. | सदस्य सचिव |

- मजीप्राचे परिपत्रक क्र.८६, दि.२१.०५.२००३ मधील निविदा मंजूरीच्या वित्तीय अधिकारामध्ये कोणतेही बदल करण्याचे प्रस्तावित नाही.

उपरोक्तनुसार निविदा समिती पुनर्रचना करण्याच्या प्रस्ताव संदर्भ क्र २.मधील टिप्पणीन्वये मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, मजीप्रा यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मा.संचालक मंडळाची मान्यता घेण्याच्या अटीच्या अधीन राहून मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा अध्यक्ष, मजीप्रा यांनी मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार कार्यालयीन आदेश क्र.मजीप्रा/सस/तांशा-१, दि.२६.०५.२०२६ अन्वये पुनर्रचनेचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार पुनर्रचना प्रस्ताव मा.संचालक मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात येऊन त्याबाबत मा. संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा होऊन पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ठराव -:**

असा ठराव करण्यात येतो की,

- कार्यालयीन आदेश क्र.मजीप्रा/सस/तांशा-१, दि.२६.०५.२०२६ अन्वये पुनर्रचित समितीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. यापुढे मजीप्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या निविदा मंजुरीकरिता पुढीलप्रमाणे निविदा समिती कार्यरत राहील.

| अ.क्र. | पदनाम | समिती पदनाम |
|---|---|---|
| १. | मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष | अध्यक्ष |
| २. | मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष | उपाध्यक्ष |
| ३. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य |
| ४. | सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| ५. | संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| ६. | ज्या विभागीय स्तरावरील निविदा स्विकृत करावयाचे प्रस्तावित आहे, त्या विभागाचे संबंधित मुख्य अभियंता. | सदस्य सचिव |

- मजीप्राचे परिपत्रक क्र.८६, दि.२१.०५.२००३ मधील निविदा मंजूरीच्या वित्तीय अधिकारामध्ये कोणतेही बदल करण्यात येऊ नयेत .

उपरोक्त ठरावानुसार पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.५ :-** राज्यात जागतिक बँक सहाय्यित राबविण्यात येणाऱ्या "महाराष्ट्र नागरी पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर कार्यक्रम (Maharashtra urban water supply, Sanitation and reuse program- MUWREP) अंतर्गत "ब" व "क" वर्ग नगरपरिषदांच्या व नगरपंचायतीच्या पाणी पुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर/मलनि:सारण प्रकल्पांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्याबाबत.

राज्यातील नागरी भागात सुरक्षित पाणीपुरवठा, प्रभावी मलनिस्सारण व्यवस्था व शाश्वत नागरी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने MUWREP प्रकल्प हाती घेतला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा या क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव, तांत्रिक कौशल्य व संस्थात्मक क्षमता विचारात घेऊन नगर विकास विभागाने शासन निर्णय क्रमांक म्युरेप-२०२६/प्र.क्र.७९/न.वि.-३३, दिनांक १० एप्रिल २०२६ अन्वये जागतिक बँक सहाय्यित "महाराष्ट्र नागरी पाणी पुरवठा , सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर (Maharashtra Urban Water Supply & Sewerage Project- MUWREP) " अंतर्गत राज्यातील "ब " व "क" वर्ग

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

नगरपरिषदांच्या व नगरपंचायतींच्या पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर प्रकल्पांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्याचा निर्णय घेतला आहे.

नागरी भागातील पाणी पुरवठा व सांडपाणी व्यवस्थापनाची वाढती गरज विचारात घेता नागरी भागातील कमाल लोकसंख्येत जलशाश्वती उपलब्ध करुन देणे, नागरी भागात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन नदीपात्रात सोडणे व प्रक्रिया केलेल्या पाण्याचा विविध प्रयोजनासाठी महसूल निर्मिती करुन वर्तुळाकार अर्थव्यवस्थेत चालना देणे, सदर प्रकल्पांसाठी विविध वित्त पुरवठ्याच्या मॉडेल (Financing Model) द्वारे जसे की, Blended finance, PPP, Annuity मॉडेल, पुल्ड बॉंड्स इ. संदर्भात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी उभारण्यास मदत करणे, त्यासोबत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक क्षमता वाढविणे हे सदर प्रकल्पाचे उद्देश आहेत.

उपरोक्त शासन निर्णयानुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प संचालक (PD) राहणार आहेत. प्रकल्प अंमलबजावणीकरीता तांत्रिक प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PTMU) गठीत करण्यात आला असून सदर कक्षाचे प्रमुख सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे असणार आहेत. MUWREP अंतर्गत राज्यातील "ब " व "क" वर्ग नगरपरिषदांच्या व नगरपंचायतींच्या पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर/ मलनि:सारण प्रकल्पांच्या अंमलबजावणीबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यकक्षा पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| | |
|---|---|
| अ. | पाणी पुरवठा आणि सांडपाणी व व्यवस्थापन व पुनर्वापर योजनांच्या सविस्तर अहवालांचे तांत्रिक परीक्षण व मूल्यांकन करणे. |
| ब. | PIU ना अंमलबजावणी व खरेदी प्रक्रियेसाठी (Procurement) आवश्यक सहाय्य करणे. |
| क. | जागतिक बँक व महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित खरेदी नियमावलीनुसार निविदा प्रक्रिया राबविणे. |
| ड. | कामांची अंमलबजावणी, गुणवत्ता नियंत्रण, करार व्यवस्थापन व प्रकल्पांचे पर्यवेक्षण करणे. |
| इ. | पर्यावरणीय व सामाजिक बाबींसंदर्भातील (Environmental & Social Framework) तरतुदींचे पालन सुनिश्चित करणे. |
| ई. | प्रकल्प पूर्ण करून संबंधित नगरपरिषदेकडे हस्तांतरित करणे. |

शासन निर्णयानुसार प्रकल्पांसाठी आवश्यक निधी शासन व जागतिक बँकेच्या मंजूर तरतुदींमधून उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर कोणताही अतिरिक्त कायमस्वरूपी आर्थिक भार पडणार नाही.

सदर कामांमुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात वाढ होणार असून राज्यातील "ब" व "क "वर्ग नगरपरिषदांमधील व नगरपंचायतीमधील पाणीपुरवठा व मलनि:सारण प्रकल्पांची प्रभावी, गुणवत्तापूर्ण व वेळेत अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्राधिकरणाकडे राहणार आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ठराव :-** उपरोक्त बाब मा.संचालक मंडळाच्या माहितीस्तव सादर करण्यात आली असता, मा.संचालक मंडळाने याबाबत नोंद घेतली.

**कार्यक्रम बाब क्र.६ :-** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे अमृत-२ तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान इ.कार्यक्रमांतर्गत तांत्रिक मान्यतेकरिता प्राप्त होणाऱ्या पाणी पुरवठा योजना तसेच मलनिस्सारण प्रकल्पास तांत्रिक मान्यता देताना म.जी.प्रा.मार्फत आकारण्यात येणाऱ्या तांत्रिक तपासणी शुल्काबाबत.

**संदर्भ :**

१. नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्र. अमृत- २०२२/प्र.क्र.२०३/नवि-३३, दि.१६.०९.२०२२.
२. नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्र.नगरो-२०२३/प्र.क्र.३८९/नवि-३३, दि.२२.०२.२०२४.
३. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण परिपत्रक क्र.१५७, दि.०२.०८.२०१४.
४. मजीप्राच्या मा.संचालक मंडळाची दि.२३.०७.२०२४ रोजी पार पडलेली १५६ वी बैठक.
५. या कार्यालयाचे पत्र क्र.मनिसंवसंकक्ष/२१६, दि.१३.०५.२०२६.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने त्यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या प्रकल्प अहवालास तांत्रिक मान्यता देताना आकारण्यात येणारे तांत्रिक तपासणी शुल्क सुलभ हप्त्यात टप्याटप्याने भरणा करून घेण्यास मा.संचालक मंडळाच्या दि.२३.०७.२०२४ रोजीच्या १५६व्या बैठकीत मान्यता प्रदान केली आहे.

तथापि, असे लक्षात आले आहे की, बहुतांश नागरी स्थानिक स्वराज्य संस्था उर्वरित तांत्रिक तपासणी शुल्काची रक्कम भरण्यास टाळाटाळ करतात. तसेच सदर प्रकल्पांना शासनामार्फत प्रशासकीय मान्यता न मिळाल्यास सदर प्रकल्पांचे उर्वरित तांत्रिक तपासणी शुल्कदेखील मजीप्रास प्राप्त होत नाही. परिणामी, मजीप्राचा महसूल बुडतो. सदर महसूल शासनात जमा करावयाचा असल्याने या थकबाकीच्या रक्कमा मजीप्रास प्राप्त होणे आवश्यक आहे.

नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेल्या प्रस्तावांची प्रलंबित असलेल्या तांत्रिक तपासणी शुल्काची माहिती अधीक्षक अभियंता, म.नि.सं.व सं.कक्ष यांनी क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त करून घेतली आहे. सर्व प्रादेशिक विभागाकडून प्राप्त माहितीनुसार एकूण रु.२०३.४५ कोटी इतक्या रक्कमेपैकी रु.७८.०४ कोटी इतकी रक्कम प्राप्त असून, रु.१२१.६२ कोटी इतकी रक्कम नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे प्रलंबित आहे. त्यामुळे तांत्रिक तपासणी शुल्क भरणा करण्याच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आले.

१. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडील प्रलंबित रक्कमा मजीप्रास अदा करणेबाबत, संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना नगरविकास विभाग स्तरावरुन सूचना निर्गमित करणे आवश्यक.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

२. यापुढे अमृत,नगरोत्थान तसेच नगरविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अन्य कार्यक्रमांतर्गत प्रकल्प अहवालांना तांत्रिक मान्यता प्रदान करणेपोटी मजीप्रास अदा करावयाची तांत्रिक तपासणी शुल्काची सर्व रक्कम प्रथम संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत मजीप्रास प्राप्त झाल्यानंतरच प्रकल्प अहवाल तांत्रिक तपासणीसाठी हाती घेण्यात येईल व तद्नंतर तांत्रिक मान्यतेबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

३. योजनेचे प्रकल्प अहवाल मजीप्राकडे तांत्रिक तपासणीसाठी सादर करताना तांत्रिक तपासणी शुल्क भरण्याची नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची परिस्थिती नसल्याचे या कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावरुन निदर्शनास आले आहे. त्यामुळे त्या योजनेच्या प्रकल्प अहवालास नगरविकास विभागाकडून प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर प्रथम हप्त्याचा निधी वितरीत करताना तांत्रिक तपासणी शुल्काची एकरकमी रक्कम थेट मजीप्राकडे नगरविकास विभागाकडून वळती करण्याबाबत नगरविकास विभागाची संमती प्राप्त झाल्यास प्रकल्पाची तांत्रिक तपासणी करुन तांत्रिक मान्यता प्रदान करणेविषयी कार्यवाही मजीप्रामार्फत करण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे चर्चा होऊन पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :-**

**असा ठराव करण्यात येतो की,**

अमृत, नगरोत्थान तसेच नगरविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अन्य कार्यक्रमांतर्गत मजीप्रामार्फत तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेल्या प्रस्तावांच्या बाबतीत पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडील प्रलंबित रक्कमा मजीप्रास अदा करणेबाबत, संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना नगरविकास विभाग स्तरावरुन सूचना निर्गमित करणे बाबत विनंती करणे.

२. यापुढे अमृत,नगरोत्थान तसेच नगरविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अन्य कार्यक्रमांतर्गत प्रकल्प अहवालांना तांत्रिक मान्यता प्रदान करणेपोटी मजीप्रास अदा करावयाची तांत्रिक तपासणी शुल्काची सर्व रक्कम प्रथम संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत मजीप्रास प्राप्त झाल्यानंतरच प्रकल्प अहवाल तांत्रिक तपासणीसाठी हाती घेण्यात येईल व तद्नंतर तांत्रिक मान्यतेबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

३. योजनेचे प्रकल्प अहवाल मजीप्राकडे तांत्रिक तपासणीसाठी सादर करताना तांत्रिक तपासणी शुल्क भरण्याची नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची परिस्थिती नसल्याचे या कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावरुन निदर्शनास आले आहे. त्यामुळे त्या योजनेच्या प्रकल्प अहवालास नगरविकास विभागाकडून प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर प्रथम हप्त्याचा निधी वितरीत करताना तांत्रिक तपासणी शुल्काची एकरकमी रक्कम थेट मजीप्राकडे नगरविकास विभागाकडून वळती करण्याबाबत नगरविकास विभागाची संमती प्राप्त झाल्यास प्रकल्पाची तांत्रिक तपासणी करुन तांत्रिक मान्यता प्रदान करणेविषयी कार्यवाही मजीप्रामार्फत करण्यात येईल.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.७ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने राज्य सार्वजनिक उपक्रमाचा तात्पुरता शिल्लक निधी गुंतवणूक करण्याबाबतचे शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राष्ट्रीयकृत व खाजगी बँकांमध्ये केलेल्या गुंतवणूकीची माहिती संचालक मंडळास सादर करुन मान्यता घेणेबाबत.

राज्य सार्वजनिक उपक्रमांनी त्यांच्याकडे शिल्लक असणारा निधी योग्यरितीने गुंतविण्यासाठी शासनाने मार्गदर्शक तत्वे विहित केलेली आहेत. शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार गुंतवणूका कराव्यात अशा शासनाने सूचना दिल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा तात्पुरता शिल्लक निधी अल्प मुदतीसाठी, दिर्घ मुदतीसाठी गुंतवणुक करण्याबाबत संचालक मंडळाची ९४-९५ वी बैठकांमधील कार्यक्रम बाब क्र.२२ अन्वये कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३५व्या बैठकीत एक वर्षा पर्यंतच्या अल्प मुदतीची गुंतवणुक करण्यासाठी १)सदस्य सचिव २) संचालक (वित्त) यांची समिती गठीत करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या सल्ल्याने सदस्य सचिव यांच्या मान्यतेने अल्प मुदत व दीर्घ मुदतीसाठी केलेल्या गुंतवणुकीची माहिती मजीप्राच्या संचालक मंडळाच्या नंतरच्या बैठकीमध्ये सादर करणे आवश्यक आहे. दि ०१.११.२०२३ ते दि.२८.०२.२०२६ या कालावधीत केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकीची माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १५९ व्या बैठकीत सादर करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील शिल्लक निधी शासन निर्णय, वित्त विभाग क्र. शासाउ-१०.१५/ प्र.क्र.४२/सा.उ., दि. २७/१०/२०१५ अन्वये गुंतवणुकीबाबत सुधारीत मार्गदर्शक तत्वे व सूचना विहित करण्यात आल्या. तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्र. संकीर्ण-२०२०/ प्र.क्र.५१/२०/कोषा प्रशा-५, दि.१३.०३.२०२० व शासन निर्णय, वित्त विभाग क्र.संकीर्ण २०२२/प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा ५ दि.२२.११.२०२३ मधील मार्गदर्शक तत्वांनुसार दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०७.२०२६ या कालावधीत संचालक (वित्त) यांच्या सल्ल्याने व सदस्य सचिव यांच्या मान्यतेने राष्ट्रीयकृत व खाजगी बँकेमध्ये अल्प मुदतीसाठी गुंतवणूक करण्यात आलेली आहे. दि.०१.०३.२०२६ ते दि. ३१.०७.२०२६ या कालावधीत कोणतीही दीर्घ मुदत गुंतवणूक करण्यात आलेली नाही.

यास अनुसरुन दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०७.२०२६ या कालावधीतील अल्प मुदतीसाठी केलेल्या गुंतवणुकीची माहिती संचालक मंडळास सादर करणे विचाराधीन होते. या कालावधीमध्ये केलेल्या १४ मुदतठेव गुंतवणुकींपैकी ६ मुदत ठेवी घसारा निधी व ८ मुदत ठेवी सर्वसाधारण निधीच्या असून ४ मुदत ठेवी राष्ट्रीयकृत बँकांमध्ये व १० मुदतठेवी खाजगी बँकांमध्ये आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०७.२०२६ या कालावधीत केलेल्या एकूण १४ अल्प मुदतीच्या गुंतवणुकीचे अवलोकन करण्यासाठी प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला असता, सदर गुंतवणुकीची नोंद संचालक मंडळाने घेतली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.८ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आर्थिक वर्ष सन २०१९-२० व सन २०२०-२१ चे वार्षिक लेख्यावरील लेखा परिक्षण अहवाल सादर करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १६० वी बैठक दिनांक १६ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत महालेखाकार कार्यालय (लेखा परीक्षा-II), महाराष्ट्र, नागपूर, त्यांचेकडील गोपनीय पत्र क्र. डी.पी.सेल/ए.एम.जी II/MJP/.ले.प.प्रतिवेदन/२०१९-२० दि.०८/०४/२०२५ आणि महालेखाकार कार्यालय (लेखा परीक्षा-II), महाराष्ट्र, नागपूर, त्यांचेकडील गोपनीय पत्र क्र. डी.पी.सेल/ए.एम.जी II/MJP/ ले.प.प्रतिवेदन/ २०२०-२१ दि.०८/०४/२०२५ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अनुक्रमे सन २०१९-२० आणि २०२०-२१ या दोन वर्षांच्या वार्षिक लेख्यावरील लेखा परीक्षण अहवाल अनुपालनासह प्राधिकरणाच्या मान्यतेकरीता या कार्यक्रम बाबीद्वारे सादर केला आहे.

प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर महालेखापालानी प्रमाणित केलेले सन २०१९-२० आणि २०२०-२१ या वर्षाचे लेखे व लेखा परीक्षण अहवाल वार्षिक अहवालासोबत विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्यासाठी मान्यता मिळण्यासाठी कार्यक्रम बाब क्र.८ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१९-२० आणि २०२०-२१ या दोन वर्षांच्या वार्षिक लेख्यावरील लेखा परीक्षण अहवाल अनुपालनासह संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली असून खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

**ठराव :-**

असा ठराव मंजूर करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१९-२० आणि २०२०-२१ या दोन वर्षांच्या वार्षिक लेख्यावरील लेखा परीक्षण अहवालास अनुपालनासह मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २०१९-२० आणि २०२०-२१ या दोन वर्षांचे वार्षिक लेखे या लेखा परीक्षण अहवालासह महाराष्ट्र राज्याच्या विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्याकरीता शासनाकडे पाठविण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे. याबाबत पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.९ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या विभागाकडून प्राप्त प्रलंबित मागण्यांसाठी मुदतठेव गुंतवणुकीतून निधी उपलब्ध होण्यास मंजूरी मिळण्याबाबत.

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण संचालक मंडळाच्या १५९ व्या बैठकीमध्ये प्राधिकरणाचे आर्थिक वर्ष २०२६-२७ चे अंदाजपत्रकांस मंजूरी देण्यात आली आहे. या अंदाजपत्रकामध्ये प्राधिकरणाचे चालू जमा व खर्च विचारात घेवून मार्च २०२६ पूर्वीच्या निधी मागणी संदर्भात तरतूद करण्यात आली नव्हती. मात्र सदर मागण्या पाणी पुरवठा केंद्र/योजना चालू ठेवण्यासाठी अत्यंत आवश्यक असल्याने सर्व विभागांकडून या संदर्भात फेर आढावा घेण्यात आला. त्यानुसार मार्च २०२६ पूर्वीच्या एकूण रु.८७.२० कोटी रकमेच्या निधी मागणी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सदर निधी वितरणाकरिता महसूली तरतूद/जमा शिल्लक नाही. त्याचप्रमाणे प्राधिकरणाचे सुधारित अंदाजपत्रक सादर करण्यास काही कालावधी लागणार आहे. दरम्यान निधी

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

मागण्याची ताठरता (Rigidity) विचारात घेता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सर्वसाधारण निधीच्या मुदत ठेव गुंतवणूकीतून निधी उपलब्ध करुन देणे हा पर्याय उपलब्ध आहे.

सद्यस्थितीत प्राधिकरणाच्या सर्वसाधारण निधीमध्ये रु.४६७.०० कोटी च्या मुदत ठेवी विविध बँकामध्ये उपलब्ध आहेत. यामध्ये रु.२९८.०० कोटी एवढ्या गुंतवणूका मुदतपूर्व परिपक्व (Callabale) स्वरुपामध्ये गुंतवण्यात आल्या आहेत. या गुंतवणूकामधून वर नमूद केल्याप्रमाणे विविध विभागाकडील मार्च २०२६ पूर्वीचे रु.८७.२० कोटी रकमेचे प्रलंबित प्रस्तावाबाबत निधी वितरण करण्यासाठी मान्यतेस्तव सादर.

२. त्याचप्रमाणे घसारा निधी करिता आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या अंदाजपत्रकामध्ये रु.११९.१५ कोटी रकमेची तरतूद करण्यात आली होती. यापैकी रु.९२.६६ कोटी रकमेचे वितरण करण्यात आले असून मंजूर तरतुदी पैकी रु.२६.४९ कोटी रक्कम शिल्लक आहे. मात्र विभागाकडून यासंदर्भात मूळ तरतुदीसह रु.२७७.८३ कोटी रकमेचे निधी मागणी प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यामुळे प्रलंबित निधी मागणी रु.१८५.१७ कोटी मधून शिल्लक रुपये २६.४९ कोटी विचारात घेता घसारा निधीच्या मुदतठेव गुंतवणूकीमधून रु.१५८.६८ कोटी रक्कम उपलब्ध करणे आवश्यक आहे. याकरीता खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

**ठराव :-**

अ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५९व्या बैठकीमध्ये प्राधिकरणाचे आर्थिक वर्ष २०२६-२७ चे अंदाजपत्रकास मंजूर देण्यात आले आहे. या अंदाजपत्रकामध्ये घसारा निधीकरीता रु.११९.१५ कोटी रक्कमेची तरतुद करण्यात आली होती. मात्र, विभागांकडून प्राप्त निधी मागणीचे प्रस्ताव विचारात घेता एकूण रु.२७७.८३ कोटी निधी मागणी प्रस्ताव प्राप्त आहेत. यामुळे सदर मुळ अंदाजामधील तरतुदीत रु.१५८.६८ कोटी रुपयाची वाढ होत आहे. सबब, आर्थिक वर्षे २०२६-२७ च्या अंदाजपत्रकामध्ये घसारा निधीसाठी केलेली तरतूद (रु.११९.१५ कोटी) विभागांकडून प्राप्त प्रस्ताव विचारात घेता सुधारीत करुन रु.२७७.८३ कोटी करण्यास मान्यता देण्यात येत आहे व सदर निधी घसारा निधीच्या मुदतठेव गुंतवणूकीमधून वितरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ब) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा केंद्रे/योजनांसाठी मार्च, २०२६ पुर्वीच्या प्रलंबित निधी मागणीबाबत आढावा घेतला असता, एकूण रु.८७.२० कोटी रक्कम आवश्यक आहे. यास्तव मार्च २०२६ पुर्वीच्या प्रलंबित देयकांसाठी रु.८७.२० कोटी सर्वसाधारण निधीच्या गुंतवणुकीतून मुदतपूर्व परिपक्व करुन निधी वितरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्त मान्यतेनुसार रकमेची देयता तपासून निधी वितरणाबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.१० :-** सिडको महामंडळाकडे कायमस्वरुपी वर्ग झालेल्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवेनुसार निवृत्ती वेतन मंजूर करणेबाबत

प्रस्तावना-

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे देखभाल दुरुस्तीसाठी असलेली शहर व औद्योगिक विकास महामंडळाची (सिडको) नवी मुंबई पाणी पुरवठा वितरण व्यवस्था, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून शहर व औद्योगिक विकास महामंडळाकडे कार्यरत असलेल्या कर्मचा-यांसह हस्तांतरीत झाली. या योजनेवर कार्यरत असलेले ५७ कर्मचाऱ्यांपैकी ३८ कर्मचारी सिडको प्रशासनाने नवी मुंबई महानगरपालिकेकडे वर्ग करावेत व उर्वरीत १९ कर्मचारी शहर व औद्योगिक विकास महामंडळाकडे कायमच्या समावेशनाने कार्यरत राहतील असे महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय दि.१४/०८/२००० व दि.२३/०३/२००१ मध्ये नमूद आहे.

२. सदर ५७ कर्मचा-यांचे कायमस्वरुपी समावेशनाबाबत महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय दि. २३ .३. २००१ अन्वये दि. १४.८.२००० च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे :-

या ५७ कर्मचा-यांपैकी ३८ कर्मचारी सिडको प्रशासनाने नवी मुंबई महानगरपालिकेकडे वर्ग करावेत व उर्वरित १९ कर्मचारी शहर व औद्योगिक विकास महामंडळाकडे कायम समावेशनाने कार्यरत राहतील.

अ) नवी मुंबई महानगरपालिकेकडे वर्ग करावयाचे ३८ कर्मचारी दि. १२.३.२००१ पासून वर्ग करण्यात आले असे गृहित धरुन याच दिनांकापासून कर्मचारी नवी मुंबई महानगरपालिकेचे कर्मचारी म्हणून समजण्यात येईल. या कर्मचा-यांचे मासिक वेतन भत्ते इ. दिनांक १२.३.२००१ पासून नवी मुंबई महानगरपालिकेने करावयाचे आहेत आणि उर्वरित १९ कर्मचा-यांचे मासिक वेतन भत्ते इ.दि. १२.३.२००१ पासून सिडको प्रशासनाने करावयाचे आहेत.

ब) या ५७ कर्मचा-यांमधून ३८ कर्मचारी नवी मुंबई महानगरपालिकेकडे वर्ग करणेबाबतचे आदेश निर्गमित करणे पूर्वी सिडको प्रशासनाने आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांची पसंती विचारात घेणे आवश्यक राहील.

क) एकूण ५७ कर्मचा-यांपैकी ३८ कर्मचा-यांचे वेतन भत्ते इ. दिनांक १२.३.२००१ पासून नवी मुंबई महानगरपालिका यांनी द्यावयाचे असल्याने तत्पूर्वीच्या कालावधीचे वेतन भत्ते इ. ची एकूण ५७ कर्मचा-यांच्या थकबाकीची प्रतीपूर्ती सिडको प्रशासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास तात्काळ करावी व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रतिपुर्तीच्या रकमेचे वाटप कर्मचा-यांना करणेबाबत तातडीने कार्यवाही करावी.

ड) वरीलप्रमाणे ५७ कर्मचा-यांचे समावेशन दि. ७ एप्रिल, १९८६ च्या शासन परिपत्रकान्वये विहित केलेल्या अटी व शर्तींना अधिन राहून करण्यात यावे.

इ) नवी मुंबई महानगरपालिकेत वर्ग होणा-या एकूण ३८ कर्मचा-यांना महानगरपालिकेने त्यांचेकडील उपलब्ध रिक्त/निर्माण होणा-या समान वेतन श्रेणीच्या पदावर सामावून घ्यावे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

३. या ५७ कर्मचा-याचे समावेशन दि. ७ /४/१९८६ च्या परिपत्रकात विहित केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यात आले आहे. दि.७/४/१९८६ रोजीचे नगर विकास विभागाचे परिपत्रक हे पाणीपुरवठा केंद्रे/महानगरपालिका/नगरपालिका यांना हस्तांतरीत करण्याबाबत असून, हस्तांतरीत योजनेतील कर्मचा-यांबाबत मार्गदर्शक तत्वे विहित केली आहेत. या परिपत्रकातील परिशिष्ट मधील परिच्छेद ४ नुसार कामगारांची हस्तांतरण होण्याच्या दिनांकापर्यंत झालेल्या सेवेचा मोबदला महापालिका /नगरपालिका यांना द्यावयाचा आहे. यामध्ये भविष्यनिर्वाह निधी व पेन्शन कॉन्ट्रीब्युशन व रजेचा कॉन्ट्रीब्युशनचा समावेश आहे.

४. प्रस्तुत प्रकरणी नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय दि. २३ मार्च, २००१ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे नवी मुंबई पाणी पुरवठा व देखभाल दुरुस्तीसाठी शहर व औद्योगिक विकास महामंडळाकडे (सिडकोकडे) कार्यरत असलेल्या ५७ कर्मचा-यांपैकी ३८ कर्मचारी सिडको प्रशासनाने नवी मुंबई महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आले व उर्वरित १९ कर्मचारी शहर व औद्योगिक विकास महामंडळाकडे (सिडकोकडे) कायम समावेशन करण्यात आले. त्यापैकी श्री.डी.बी.कांबरी यांचे म.जी.प्रा.कडे सेवेत असताना दि.२७/१२/१९९६ रोजी निधन झाल्याने १८ कर्मचारी यांचे सिडकोकडे कायमचे समावेशन करण्यात आले. तसेच श्री.कांबरी यांच्या कुटुंबियांना म.जी.प्रा.कडून कुटुंब निवृत्तीवेतन देण्यात येते. (पीपीओ क्र.२६६८)

५. श्री.रविंद्र काशप्पा पुटगे, मदतनीस हे सिडकोकडे समावेशन झालेल्या १९ कर्मचा-यांपैकी होते. ते दि. ३०/०६/२०१३ रोजी सिडकोमधून सेवानिवृत्त झाले. श्री.पुटगे यांची समावेशनापूर्वी महाराष्ट्र जीव न प्राधिकरणाकडे १५ वर्ष ८ महिने सेवा झाली होती. इतर स्वराज्य संस्थेमध्ये निवृत्तीवेतनाचा लाभ दिला जातो त्याप्रमाणे सिडकोमध्ये निवृत्तीवेतनाचा लाभ दिला जात नाही. या बाबी विचारात घेवुन श्री.पुटगे यांना सेवानिवृत्तीवेतन देण्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, वित्त-२/ निवृत्ती वेतन शाखेने टिप्पणी सादर केली असता, सदर टिप्पणीवर श्री. पुटगे व अन्य १८ कर्मचारी म.ना.से. (नि.वे.) नियम क्र.६७ अन्वये सदर कर्मचारी निवृत्ती वेतन मिळण्यास पात्र आहेत, त्यास तत्कालिन मा.सदस्य सचिव यांनी दि.३०/७/२०१४ च्या टिप्पणीन्वये मान्यता दिली आहे.

त्यानुसार सिडको प्रशासनाकडे वर्ग झालेल्या खालील कर्मचा-यांना तत्कालीन मा.सदस्य सचिव यांचे मान्यतेने निवृत्ती वेतन व त्या अनुषंगिक लाभ लागू करण्यात आले आहे. निवृत्ती वेतन लागू करण्याबाबतची संपूर्ण कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निवृत्ती वेतन शाखेकडून करण्यात आली आहे.

६. **म.जी.प्रा.कडून निवृत्तीवेतन सुरु करण्यात आलेल्या कर्मचा-यांचे विवरणपत्र**

| अ. क्र. | नाव | आदेश क्र. व दिनांक | मंजूर करण्यात आलेल्या निवृत्तीवेतनाची रककम |
|---|---|---|---|
| १ | श्रीम.अरुणा गणपत हिरवे | कुटुंबनिवृत्तीवेतन आदेश क्र. MJP/FA-II/Pension/PPONo.१०५८७, दि.०१/०७/२०१७ | रु.२८८२/-द.म. |
| २ | श्री.हिराजी हाल्या पाटील | निवृत्तीवेतन आदेश क्र. MJP/FA-II/Pension/PPONo.११३२५ दि.२६/१०/२०१८ | रु.२८८२/- द.म. |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्री.रविंद्र काशप्पा पुटगे | निवृत्तीवेतन आदेश क्र. MJP/FA-II/Pension/PPONo.९४६६ दि.३१/१०/२०२४ | रु.२८८२/- द.म. |

७. उपरोक्त तीन प्रकरणानंतर प्राप्त झालेल्या श्री.चंद्रकांत केरप्पा सांवत या कर्मचा-यांच्या प्रस्तावाबाबत नियम ६७ (ई) नुसार विकल्प दिला नसल्याने निवृत्तीवेतनाऐवजी ठोक रक्कम प्रदान करण्यात आले आहे. तद्नंतरअन्य कर्मचा-यांनादेखील त्याप्रमाणे ठोक रक्कम देण्यात आली आहे.

८. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने म.जी.प्रा., मध्यवर्ती कार्यालयाच्या दि.१८/९/२०२५ च्या पत्रान्वये १८ कर्मचा-यांची यादी सिडको प्रशासनाकडे कार्यरत असलेले व तेथून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांची माहिती तपासून सादर करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार सिडको प्रशासनाच्या दि.०३/११/२०२५ च्या प्राप्त माहितीनुसार खालीलप्रमाणे विवरणपत्र तयार करण्यात आले आहे.:-

| अ. क्र | कर्मचा-याचे नाव | पदनाम | म.जी.प्रा.मध्ये रुजू दिनांक | सिडको महामंडळातील रुजू दिनांक | सिडको महामंडळातील सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.वामन नामदेव काकडे | मदतनीस | दि.२४/७/१९८६ | दि.१२/३/२००१ | मयत दि.१२/७/२००६ |
| २ | श्री.एकनाथ मिनानाथ भोईर | मदतनीस | दि.१/७/१९८५ | दि.१२/३/२००१ | दि.३१/१२/२०१८ |
| ३ | श्री.महादेव पोशा घरत | मदतनीस | दि.१/७/१९८५ | दि.१२/३/२००१ | दि.२९/०२/२०२० |
| ४ | श्री.चंद्रकांत केराप्पा सावंत | मदतनीस | दि.१/७/१९८५ | दि.१२/३/२००१ | दि.३१/५/२००६ |
| ५ | श्री.भगवान हिरु पवार | मदतनीस | दि.२१/६/१९९० | दि.१२/३/२००१ | दि.३१/५/२०१८ |
| ६ | श्री.नारायण तुकाराम पाटील | मदतनीस | दि.१०/७/१९८५ | दि.१२/३/२००१ | दि.३१/५/२०२१ |
| ७ | श्री.ए.एच.दावणे | मदतनीस | दि.१/७/१९८५ | दि.११/०३/२००१ रोजी मजीप्रा येथून कार्यमुक्त | कार्यकारी अभियंता ठाणे यांचेकडून प्रस्ताव प्राप्त. (मयत दि.१३/०१/२०२६) |
| ८ | श्री.रविंद काशप्पा पुटगे | मदतनीस | दि.१/७/१९८५ | दि.१२/३/२००१ | दि.३०/६/२०१३ |
| ९ | श्री.पद्माकर बुधाजी खारके | मदतनीस | दि.२४/७/१९८६ | दि.१२/३/२००१ | दि.३१/५/२०२४ |
| १० | श्री.शामकांत | मदतनीस | दि.२४/७/१९८६ | दि.१२/३/२००१ | मयत |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कमल्या भोईर | | | | दि.२९/७/२०२१ |
| ११ | श्री.ए.डी.साळुंके | मदतनीस | दि.१०/७/१९८५ | दि.१२/३/२००१ | माहिती उपलब्ध नाही |
| १२ | श्री.हिराजी हाल्या पाटील | मदतनीस | दि.१/७/१९८५ | दि.१२/३/२००१ | दि.३१/१/२०१६ |
| १३ | श्री.गणपत मारुती हिरवे | मदतनीस | दि.१/७/१९८५ | दि.१२/३/२००१ | मयत दि.२१/४/२०१२ |
| १४ | श्री.वसंत तुकाराम म्हात्रे | मदतनीस | दि.१३/६/१९८५ | दि.१२/३/२००१ | दि.३१/५/२०२० |
| १५ | श्री.रघुनाथ गणपत म्हात्रे | मदतनीस | दि.१०/७/१९८५ | दि.१२/३/२००१ | दि.३०/९/२०१६ |
| १६ | श्री.जगदिश गोपाळ भगत | मिटर वाचक | दि.१९/१/१९८७ | दि.१२/३/२००१ | दि.३१/५/२०१८ |
| १७ | श्री.जनार्दन दुंदा पाटील | मदतनीस | दि.१०/७/१९८५ | दि.१२/३/२००१ | दि.३१/५/२०२५ |
| १८ | श्री.रोहिदास परशुराम गायकवाड | मदतनीस | दि.९/१२/१९८६ | दि.१२/३/२००१ | दि.३१/५/२०१९ |

९. तसेच सिडको प्रशासनाकडे वर्ग होणा-या एकूण १८ कर्मचा-यांपैकी श्री.ए.एच.दावणे, मदतनीस यांना तत्कालीन कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.विभाग ठाणे यांनी दि.११/३/२००१ रोजी कार्यमुक्त केले आहे. परंतु श्री.दावणे हे संबंधीत सिडको प्रशासनाकडे हजर झाले नाहीत.तसेच श्री.ए.डी.साळुंके हे सन १९९८ पासून परागंदा झाले आहे. त्यामुळे या दोघांची माहिती उपलब्ध नसल्याचे सिडको ने त्यांच्या पत्रात कळविले आहे.

१०. **म.जी.प्रा. कार्यालयास निवृत्तीवेतन प्रस्ताव प्राप्त नसलेल्या कर्मचा-यांचे विवरणपत्र**

| अ.क्र | कर्मचा-याचे नाव | पदनाम | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | श्री.वामन नामदेव काकडे | मदतनीस | निवृत्तीवेतन प्रस्ताव प्राप्त नाही |
| २ | श्री.ए.एच.दावणे | मदतनीस | सिडको प्रशासनाकडे हजर झाले नाहीत. तथापि कार्यकारी अभियंता ठाणे यांचेकडून प्रस्ताव प्राप्त. |
| ३ | श्री.पद्माकर बुधाजी खारके | मदतनीस | निवृत्तीवेतन प्रस्ताव प्राप्त नाही |
| ४ | श्री.शामकांत कमल्या भोईर | मदतनीस | निवृत्तीवेतन प्रस्ताव प्राप्त नाही |
| ५ | श्री.ए.डी.साळुंके | मदतनीस | सन १९९८ पासून परागंदा सिडकोकडे रुजू झाले नाही (निवृत्तीवेतन प्रस्ताव अप्राप्त) |
| ६ | श्री.रघुनाथ गणपत म्हात्रे | मदतनीस | निवृत्तीवेतन प्रस्ताव प्राप्त नाही |
| ७ | श्री.जगदिश गोपाळ भगत | मिटरवाचक | निवृत्तीवेतन प्रस्ताव प्राप्त नाही |
| ८ | श्री.जनार्दन दुंदा पाटील | मदतनीस | निवृत्तीवेतन प्रस्ताव प्राप्त नाही |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

११. **म.जी.प्रा.कार्यालयाकडून ठोक रक्कम देण्यात आलेल्या कर्मचा-यांचे विवरणपत्र**

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | पदनाम | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | श्री.एकनाथ मिनानाथ भोईर | मदतनीस | म.जी.प्रा.मध्यवर्ती कार्यालयाचे मंजूरी आदेश क्र १७३ दि. ०३/०२/२०२३ अन्वये ठोक रक्कम रु.१,२२,९९७/-दि. १६/०२/२०२३ रोजी त्यांचे बँकखाती neft द्वारे प्रदान करण्यात आले. तसेच आदेश दि.०३/०२/२०२३अन्वये उपदान मंजूर करण्यात आले असून उपदान रक्कम रु.२५,०७१/-दि. १६/०२/२०२३ रोजी neft द्वारे प्रदान करण्यात आली आहे. |
| २ | श्री.महादेव पोशा घरत | मदतनीस | म.जी.प्रा.मध्यवर्ती कार्यालयाचे मंजूरी आदेश क्र१०१८ दि.२६/०२/२०२३ अन्वये ठोक रक्कम रु.१,३९,८९४/- दि.०१/०३/२०२४ रोजी त्यांचे बँकखाती neft द्वारे प्रदान करण्यात आले. तसेच उपदान मंजूरी आदेश क्र. १८७३६ दि.२६/०२/२०२४ अन्वये उपदान रक्कम रु.२५,०७१/-दि. ०१/०३/२०२४ रोजी neft द्वारे प्रदान करण्यात आली आहे |
| ३ | श्री.चंद्रकांत केराप्पा सावंत | मदतनीस | म.जी.प्रा. मध्यवर्ती कार्यालयाचे मंजूरी आदेश क्र १६१ दि.३०/१/२०२३ अन्वये ठोक रक्कम रु.१,२२,९९७/- दि.०१/०२/२०२३ रोजी त्यांचे बँकखाती neft द्वारे प्रदान करण्यात आली. तसेच मंजूरी आदेश दि.०१/०२/२०२३ अन्वये उपदान रक्कम रु. २५,०७१/- दि. १६/०२/२०२३ रोजी त्यांचे बँकखाती neft द्वारे प्रदान करण्यात आली आहे. |
| ४ | श्री.भगवान हिरु पवार | मदतनीस | म.जी.प्रा. मध्यवर्तीकार्यालयाचे मंजूरी आदेश क्र.१०२१ दि.२६/०२/२०२४ अन्वये ठोक रक्कम रु.१,०१,९१६/- दि. ०१/०३/२०२४ रोजी त्यांचे बँक खाती neft द्वारे प्रदान करण्यात आली. तसेच उपदान मंजूरी आदेश क्र. १०१५ दि.२६/०२/२०२३ अन्वये उपदान रक्कम रु.१८,८५०/- दि. १/०३/२०२४ रोजी neft द्वारे प्रदान करण्यात आली आहे |
| ५ | श्री.नारायण तुकाराम पाटील | मदतनीस | म.जी.प्रा.मध्यवती कार्यालयाचे मंजूरी आदेश क्र. १०२० दि.२६/०२/२०२४ अन्वये ठोक रक्कम रु.१,४२,०७४/- दि.१/०३/२०२४ रोजी त्यांचे बँकखाती neft द्वारे प्रदान करण्यात आली. तसेच उपदान मंजूरी आदेश क्र. १०१४दि. २६/०२/२०२३ अन्वये उपदान रक्कम रु.२५,०७१/-दि. ०१/०३/२०२४ रोजी neft द्वारे प्रदान करण्यात आली आहे. |
| ६ | श्री.वसंत तुकाराम | मदतनीस | मध्यवर्ती कार्यालयाचे मंजूरी आदेश क्र १०१७ दि.२६/०२/२०२४ |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा

| | | | |
|---|---|---|---|
| | म्हात्रे | | निवृत्तीवेतन ठोक रक्कम रु.१,०५,३३६/- दि. ०१/०३/२०२४ रोजी त्यांचे बँकखाती neft द्वारे प्रदान करण्यात आले. उपदान मंजूरी आदेश क्र. १०१६ दि. २६/०२/२०२३ अन्वये उपदान रक्कम रु.१८,८५०/- दि.०१/०३/२०२४ रोजी त्यांचे बँकखाती neft द्वारे प्रदान करण्यात आले. |
| ७ | श्री.रोहिदास परशुराम गायकवाड | मदतनीस | म.जी.प्रा.मध्यवर्ती कार्यालयाचे मंजूरी आदेश क्र. १०१९ दि. २६/०२/२०२४ निवृत्तीवेतन ठोक रक्कम रु.१,२७,२६०/- दि.१/३/२०२४ रोजी त्यांचे बँकखाती एनईएफटीद्वारे प्रदान करण्यात आले व उपदान मंजूरी आदेश क्र. १८७३७ दि. २६/०२/२०२३ अन्वये उपदान रक्कम रु.२३,४०५/-दि. ०१/०३/२०२४ रोजी त्यांचे बँकखाती neft द्वारे प्रदान करण्यात आले. |

१२. तसेच वरील विवरणपत्रातील अ.क्र.७ मध्ये नमूद श्री.रोहिदास परशुराम गायकवाड मा.लोकआयुक्त यांचेकडे दि. २८/१२/२०२३ च्या पत्रान्वये तक्रार दाखल केली असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील दि.०९.१२.१९८६ ते दि.११.०३.२००१ या कालावधीची महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम ,१९८२ मधील नियम ६७ (ई) नुसार निवृत्तीवेतनाऐवजी ठोक रक्कम रु.१,५०,०००/- प्रदान करण्यात आली आहे. तथापि ती त्यांना मान्य नसल्याने त्यांनी निवृत्तीवेतनाची मागणी केली आहे. सदर प्रकरणी याबाबत मा. लोकआयुक्त यांचेकडे दि.३०/९/२०२५ रोजी सुनावणी झाली. सदर सुनावणीसाठी सादर केलेल्या अहवालानुसार मा.लोकआयुक्त यांनी सदर प्रकरण संचालक मंडळासमोर ठेवून मंजूर करण्याबाबत आदेश दिले आहेत. दरम्यान मा.लोकआयुक्त यांनी दि.८/१/२०२६ रोजीच्या आदेशान्वये सदर प्रकरणातील सर्व १८ कर्मचा-यांना वैयक्तिक सुनावणी देण्याचे आदेशित केले होते. त्यानुसार दि.७/४/२०२६ रोजी मा.सदस्य सचिव यांचेकडे वैयक्तिक सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीचे आदेश पारीत करण्यासाठी काही कालावधी आवश्यक असल्याचे मा.लोकआयुक्त यांना दि.२१/४/२०२६ रोजीच्या सुनावणीवेळी सांगितले असता मा.लोकआयुक्त यांनी दि.३०/०९/२०२५ रोजीच्या आदेशास अनुसार कार्यवाही करुन तक्रारदार व समान प्रकारच्या कर्मचा-यांची देयके द्यावीत असे आदेश दिले. त्यानंतर मा.लोकआयुक्त यांनी दि.१८/६/२०२६ व दि. २७/८/२०२६ रोजी झालेल्या सुनावणीत सदर प्रकरणी ४ आठवडयात निर्णय घेण्याबाबतचे निर्देश दिले आहेत. दि.३०/९/२०२५ च्या आदेशास अनुसरुन सदर कार्यक्रम बाब मा.संचालक मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

१३. सदर प्रकरणी नमूद करण्यात येते की, सिडको महामंडळाकडे कायमस्वरुपी वर्ग झालेल्या श्री वसंत तुकाराम म्हात्रे (मदतनीस ) व इतर कर्मचा-यांनी प्राधिकरणाकडील सेवेचे निवृत्ती वेतन व मृत्यु उपदान देणेबाबतची विनंती अर्ज सादर केले आहे. सदर कर्मचा-यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये १० ते १५ वर्ष

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

काम केलेले आहे. दि.१२/३/२००१ पासून शासनाच्या आदेशानुसार सदर कर्मचा-यांना सिडको प्रशासनाकडे वर्ग करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये असलेले १८ कर्मचा-यापैकी १) श्री.आर.के.पुटगे २) कै.गणपत मारुती हिरवे ३) श्री. हिराजी हाल्या पाटील हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत व त्यांना तत्कालीन सदस्य सचिव यांचे मान्यतेने निवृत्तीवेतन देण्यात आलेले असल्याने उर्वरीत निवृत्त कर्मचा-यांनी त्यांना दिलेली ठोक रक्कम परत घेऊन निवृत्तीवेतनाची मागणी केली आहे.

१४. **महामंडळ, स्वायत्त संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण यामध्ये किंवा याखाली सामावून घेतल्यानंतरचे निवृत्तीवेतन अदा करण्याबाबत म.ना.से. (नि.वे.) नियम क्र.६७ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे:-**

"ज्या स्थायी शासकीय कर्मचा-यास, प्रतिनियुक्तीवर असताना संपूर्णत: किंवा बहुतांशी शासनाच्या मालकीच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या महामंडळातील किंवा कंपनीतील किंवा स्वायत्त मंडळातील अथवा स्थानिक प्राधिकरणातील सेवेमध्ये किंवा पदावर सामावून घेतले जाण्यास परवानगी दिलेली असेल तो शासकीय कर्मचारी, असे समावेशन लोकहितार्थ असल्याचे शासनाने घोषित केले असेल तर, अशा समावेशनाच्या तारखेपासून सेवानिवृत्त झाला असल्याचे मानण्यात येईल आणि ज्या तारखेपासून यथाप्रमाणे निवृत्ती वेतन, उपदान इत्यादी खालीलप्रमाणे वितरण योग्य होईल त्या तारखेपासून त्याने, निवड केली असेल अथवा त्याने निवड केली असल्याचे मानण्यात येईल असे, निवृत्तीवेतन-विषयक लाभ मिळण्यास तो पात्र होईल. "

(ए) यथाप्रमाणे निवृत्तिवेतन आणि मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदान हे, त्याच्या समावेशनाच्या तारखेपर्यंत त्याची शासनाकडे जी अर्हताकारी सेवा झाली असेल त्या सेवेच्या कालावधीवर आधारित असेल. समावेशनाच्या तारखेपूर्वीच्या दहा महिन्यांच्या निवृत्तिवेतनार्ह वेतनाच्या आधारे निवृत्तिवेतनाची गणना करण्यात येईल आणि समावेशनाच्या लगतपूर्वीच्या वेतनाच्या आधारे मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदानाची गणना करण्यात येईल.

(बी) समावेशनाच्या वेळी शासकीय कर्मचाऱ्याची १० वर्षापेक्षा कमी सेवा झालेली असेल आणि त्याला निवृत्तिवेतनाचा हक्क नसेल अशा प्रकरणी, तो निवृत्तिवेतनाच्या ऐवजी केवळ प्रमाणशीर सेवा उपदान मिळण्यास आणि सेवा कालावधीच्या आधारे मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदान मिळण्यास पात्र होईल.

(सी) शासकीय कर्मचाऱ्याला सामावून घेतले जाईल त्यावेळी निवृत्तिवेतनाची/ उपदानाची आणि मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदानाची रक्कम एकाच वेळी परिगणित करण्यात येईल आणि ती त्या शासकीय कर्मचाऱ्याला तसेच संबंधित संघटनेला कळविण्यात येईल.

(डी) शासनाकडे केलेल्या सेवेच्या संबंधात अनुज्ञेय असलेले यथाप्रमाणे निवृत्तिवेतन, उपदान इत्यादींच्या रकमा, त्याला लागू असलेल्या नियमानुसार आधीच्या तारखेस तो स्वेच्छेने सेवानिवृत्त होऊ शकला असता ती तारीख, किंवा संबंधित संघटनेमध्ये त्याला सामावून घेतल्याची तारीख, यापैकी जी नंतरची असेल तारखेपासून वितरणयोग्य होतील.

(ई) प्रत्येक शासकीय कर्मचारी, त्याला सामावून घेण्यात आल्यापासून सहा महिन्यांच्या आत खाली दर्शविलेल्या विकल्पांपैकी एका विकल्पाची निवड करील:-

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

(एक) वरील (ए) अनुसार अगोदरच परिगणित केलेले मासिक निवृत्तिवेतन आणि मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदान घेणे, किंवा

(दोन) मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदान आणि ज्या तारखेपासून यथाप्रमाणे निवृत्तिवेतन, उपदान इत्यादी वितरणयोग्य होतील त्या तारखेला प्रचलित असलेल्या अंशराशीकरण तक्त्यावरून काढलेली निवृत्तिवेतनाऐवजीची ठोक रक्कम घेणे.

विहित कालावधीत कोणतांच विकल्प दिला नाही तर, शासकीय कर्मचान्य आपोआपच वरील (दोन) मधील विकल्प लागू होईल. एकदा दिलेला वि अंतिम असेल. विकल्प लेखी दिला पाहिजे आणि तो संबंधित उपक्रमाला, विभागाला व लेखापरीक्षा कार्यालयाला कळविला पाहिजे.

**१५. उपरोक्त वस्तूस्थिती विचारात घेता खालील बाबी स्पष्ट होतात :-**

- नवी मुंबई पाणी पुरवठा वितरण व्यवस्था मजीप्राकडून दि.01/10/1988 रोजी सिडकोला हस्तांतरीत करण्यात आली. त्या वितरण व्यवस्थेवर काम करणारे 57 कर्मचा-यांचे शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. एनएमसी-16200/ 136/प्र.क्र.91/ 2000/नवि-24 दि.14/08/2000 अन्वये सिडकोकडे समावेशन करण्यात आले. त्यानंतर दि.23/03/2001 च्या शा. नि. द्वारे 57 कर्मचा-यांपैकी 38 कर्मचारी सिडको प्रशासनाने नवी मुंबई मनपाकडे वर्ग केले व उर्वरीत 19 कर्मचा-यांपैकी १८ कर्मचारी सिडको प्रशासनाकडे समावेशन झाले. तथापि या १८ कर्मचा-यामधील २ कर्मचा-यांबाबत सिडकोकडे माहिती उपलब्ध नाही. श्री.दावणे हे सिडको प्रशासनाकडे हजर झाले नाहीत व श्री.साळुंके सन १९९८ पासून परागंदा आहेत.
- कायम समावेशनाने सिडको मध्ये कायम करण्यात आलेल्या 1८ कर्मचा-यांपैकी श्री. रविंद्र काशप्पा पुटगे, मदतनीस हे दि.30/06/2013 रोजी नियतवयोमानानुसार सिडकोकडून सेवा निवृत्त झाले. तथापि दि.01/07/1985 ते दि.11/03/2001 पर्यंत मजीप्रा मधील सेवा केली त्याचे निवृत्तीवेतन मिळण्याकरीता श्री. पुटगे यांनी अर्ज केला. त्यावर निवृत्तीवेतन शाखेने टिप्पणीवर नियम 67 ई प्रमाणे ठोक रक्कम देण्याचा प्रस्ताव दि.30/07/2014 रोजी सादर केला गेला तसेच निवृत्तीवेतनाचे लाभ कसा दयावा हयाबाबत आदेशाकरीताही प्रस्तावात नमूद केले गेले. त्यास उपमुख्य लेखा अधिकारी (2) यांनी "श्री. पुटगे व अन्य 18 कर्मचारी यांना मनासे (नि वे) नियम क्र.67 अन्वये यथाप्रमाण निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र आहेत" असा शेरा दिला गेला. त्यास मा. संचालक (वित्त) तसेच मा. सदस्य सचिव यांची मान्यता मिळाली. त्यानुसार श्री. पुटगे यांचे दि.31/10/2014 पासून किमान निवृत्तीवेतनावर निवृत्तीवेतनाचे आदेश निर्गमित केले गेले.
- श्री. पुटगे व इतर दोन कर्मचारी यांनी विहीत मुदतीत विकल्प दिलेला नाही तरी त्यांना तत्कालीन सदस्य सचिव यांच्या मान्यतेनुसार मजीप्राकडून मासिक निवृत्तीवेतन मंजूर करण्यात आलेले आहे. त्यामुळे सिडकोकडे समावेशन करण्यात आलेले अन्य 15 कर्मचाऱ्यांनी मजीप्राकडील सेवा कालावधीतील निवृत्तीवेतनाची मागणी केलेली आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

- महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम, 1982 मधील नियम ६७ नुसार ज्या स्थायी शासकीय कर्मचा-यास प्रतिनियुक्तीवर असताना शासनाच्या नियंत्रणाखालील असलेल्या महामंडळ/कंपनी/स्वायत्त मंडळ/ स्थानिक प्राधिकरण सेवेमध्ये सामावून घेण्यास परवानगी दिली असेल तर तो कर्मचारी अशा समावेशन झाल्याच्या तारखेपासून सेवानिवृत्त झाला असे मानण्यात येईल. आणि ज्या तारखेपासून यथाप्रमाणे निवृत्तीवेतन, उपदान इ. (नियम 67 मधील ए ते के) प्रमाणे वितरणयोग्य होतील.
- नियम 67 (सी) नुसार शासकीय कर्मचा-याला सामावून घेतले जाईल निवृत्तीवेतनाची /उपदानाची आणि मृत्यू नि सेवा उपदानाची रक्कम एकाच वेळी परिगणीत करण्यात येईल आणि ती त्या शासकीय कर्मचा-याला तसेच संबंधीत संघटनेला कळविण्यात येईल. ६७( ई) नुसार प्रत्येक शासकीय कर्मचारी त्याला सामावून घेण्यात आल्यापासून सहा महिन्याच्या आत खाली दर्शविलेल्या विकल्पापैकी एका विकल्पाची निवड करेल.

(एक) वरील (ए) अनुसार अगोदरच परिगणित केलेले मासिक निवृत्तिवेतन आणि मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदान घेणे, किंवा

(दोन) मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदान आणि ज्या तारखेपासून यथाप्रमाणे निवृत्तिवेतन, उपदान इत्यादी वितरणयोग्य होतील त्या तारखेला प्रचलित असलेल्या अंशराशीकरण तक्त्यावरून काढलेली निवृत्तिवेतनाऐवजीची ठोक रक्कम घेणे.

विहित कालावधीत कोणताही विकल्प दिला नाही तर शासकीय कर्मचा-यास आपोआपच वरील दोन मधील विकल्प लागू होईल.

- सिडको प्रशासनाकडे वर्ग केलेल्या १८ कर्मचा-यांपैकी तीन कर्मचा-यांना म.ना.से. निवृत्तीवेतन क्र.६७ (ए) नुसार निवृत्तीवेतन मंजूर करण्यात आले आहे. तसेच ७ कर्मचा-यांना ६७ (ई) (२) नुसार ठोक रक्कम देण्यात आली आहे.
- श्री. पुटगे व इतर 2 कर्मचारी यांनी महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम ६७ अन्वये निवड करण्यासाठी कोणताही विकल्प दिलेला दिसून येत नाही. तरी त्यांना तत्कालीन सदस्य सचिव यांचे मान्यतेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून निवृत्तीवेतन मंजूर करण्यात आले आहे.
- सिडको प्रशासनाकडे वर्ग होणा-या एकूण १८ कर्मचा-यांपैकी श्री.ए.एच.दावणे, मदतनीस यांना तत्कालीन कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.विभाग ठाणे यांनी दि.११/३/२००१ रोजी कार्यमुक्त केले आहे. परंतु श्री.दावणे हे संबंधीत सिडको प्रशासनाकडे हजर झाले नाहीत. श्री.दावणे यांचे दि.१३/०१/२०२६ रोजी निधन झाले आहे. परंतु श्री.दावणे यांचा मजीप्राकडील दि.१/७/१९८५ ते दि.११/३/२००१ या कालावधीतील कार्यरत कालावधी लक्षात घेऊन सेवानिवृत्ती लाभ मिळावेत अशी मागणी त्यांच्या मुलाने केली असून कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, ठाणे यांनी दि.२२/०५/२०२६ च्या पत्रान्वये याबाबत प्रस्ताव सादर केला आहे. यास्तव सदर कार्यक्रम बाबीमध्ये होणारा निर्णय श्री.दावणे यांना देखिल लागू होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने निर्णयास्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे देखभाल दुरुस्तीसाठी असलेली नवी मुंबई पाणीपुरवठा वितरण व्यवस्था, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून शहर व औद्योगिक विकास महामंडळाकडे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसह हस्तांतरित झाली. या योजनेमधील सिडको महामंडळाकडे कायमस्वरूपी वर्ग झालेल्या कर्मचाऱ्यांनी प्राधिकरणाकडील सेवा कालावधीचे निवृत्तीवेतन दायित्व व मृत्यू उपदान देणे बाबत विनंती केली होती. सिडकोकडे वर्ग झालेल्या १८ कर्मचाऱ्यांपैकी ०३ कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन अदा करण्यात आले आहे. ०७ कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनाऐवजी ठोक रक्कम अदा करण्यात आली आहे. सदर कर्मचाऱ्यांनी ठोक रक्कम वळती करून सेवानिवृत्ती वेतन अदा करण्याची विनंती केली आहे. तसेच मा.लोकायुक्त यांनी देखील या अनुषंगाने आदेश दिले आहेत. सबब या कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती वेतन/ठोक रक्कम बाबतीत नियमांतील तरतुद तसेच मा.लोकायुक्त यांचे आदेश विचारात घेता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कायदेशीर सल्ला (legal opinion) घेण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर करावा. शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार याप्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात यावी. सदर कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.११ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०२२-२३ चा वार्षिक प्रशासनिक अहवाल संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी ठेवणे बाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०२२-२३ च्या वार्षिक प्रशासनिक अहवालाबाबत सदस्य सचिव यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव पारित करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०२२-२३ या वर्षाचा वार्षिक प्रशासनिक अहवाल स्विकृत करण्यात येत असून तो विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात पटलावर ठेवण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१२ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या क्षेत्रिय कार्यालयांची रचना सुधारीत करणेबाबत

मा.जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी, दि.६/३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये नंदुरबार जिल्हा हा आदिवासी बहुसंख्यांक व आकांक्षित जिल्हा असून लक्षांक पूर्ण करण्याकरिता नंदुरबार किंवा धुळे येथे विभागीय कार्यालय

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

व अक्राणी येथे उप विभागीय कार्यालय स्थापन करण्याबाबत प्रस्तावित केले आहे. जिल्हाधिकारी, नंदुरबार यांचे सदर दि.६/३/२०२६ चे पत्राचे अनुषंगाने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा स्वयंस्पष्ट अभिप्रायांकीत अहवाल आवश्यक त्या कागदपत्रांसह शासनास तात्काळ सादर करणेबाबत, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे दि.१७/७/२०२६ चे पत्राने सूचना प्राप्त झाल्या आहेत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकक्षेतील धुळे व नंदुरबार जिल्ह्याचा कार्यभार कमी करुन धुळे येथे नवीन विभागीय कार्यालय स्थापन करणेबाबत व नंदुरबार जिल्ह्यात अक्राणी तालुक्यात नवीन उपविभाग निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव, अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, जळगांव यांनी, कार्यालयीन पत्र क्र.२५४, दि.४/३/२०२६ अन्वये सादर केलेला आहे. सद्यस्थितीत धुळे व नंदुरबार येथे विभागीय कार्यालय नाही. तसेच राज्यातील प्रत्येक जिल्हयाच्या मुख्यालयात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे विभागीय कार्यालय नाही. यास्तव सध्याच्या कार्यालयांची रचना सुधारीत करण्यासाठी सदर कार्यक्रम बाब सादर करण्यात येत आहे.

**२.क्षेत्रिय कार्यालयांची सध्याची रचना :**

सद्यस्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची कार्यालयनिहाय रचना खालीलप्रमाणे कार्यरत आहेत.

| अ.क्र. | प्रादेशिक कार्यालय | मंडळ कार्यालय | विभागीय कार्यालये | उपविभागीय कार्यालये |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | २ | ७ | २२ |
| २ | पुणे | २ | ७ | ३१ |
| ३ | नाशिक | ३ | ५ | १९ |
| ४ | छत्रपती संभाजीनगर | ३ | ७ | २३ |
| ५ | अमरावती | २ | ६ | २१ |
| ६ | नागपूर | २ | ५ | १५ |
| एकूण | ६ | १४ | ३७ | १३१ |

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे शासन निर्णय क्र.मजीप्रा-१११७/प्र.क्र.२४७(भाग-१)/पापु-२३, दि.१८/६/२०२४ अन्वये पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे. वर दर्शविलेल्या रचनेमध्ये १ मंडळ कार्यालय व ३ उपविभागीय कार्यालये आकृतीबंधापेक्षा अधिक आहेत.

**३. प्रस्तावित क्षेत्रिय कार्यालय रचना :**

शासनाने मंजूर केलेला आकृतीबंध विचारात घेऊन तसेच प्रत्येक जिल्हयात विभागीय कार्यालय निर्माण करण्यासाठी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कार्यालयांची जिल्हानिहाय रचना खालीलप्रमाणे करण्यास प्रस्तावित आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | म.जी.प्रा. विभागाचे नांव | शेरा | म.जी.प्रा. उप विभागाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| **प्रादेशिक विभाग, ठाणे** | | | | | |
| १.मंडळ,ठाणे | | | | | |
| १)<br>२)<br>३) | ठाणे<br>मुंबई शहर<br>मुंबई उपनगर | विभाग,ठाणे | ज.व्य.विभाग, अंबरनाथ हे विभाग ठाणे मध्ये एकत्रित (merge) होईल. | उपविभाग,ठाणे<br>उपविभाग क्र.२,ठाणे<br>उपविभाग,शहापूर<br>ज.व्य.उ.वि.क्र.१,अंबरनाथ<br>ज.व्य.उ.वि.क्र.२,अंबरनाथ<br>ज.व्य.उ.वि.क्र.३,अंबरनाथ<br>ज.व्य.उ.वि.बदलापूर | |
| ४) | पालघर | विभाग, विरार (पालघर) | | ज.व्य.उ.वि.क्र.१,विरार<br>ज.व्य.उ.वि.क्र.२,विरार<br>उपविभाग,पालघर<br>ज.व्य.उ.वि.क्र.५,वाणगांव | |
| २.मंडळ, पनवेल | | | | | |
| ५) | रायगड | विभाग,पनवेल | विभाग,माणगांव हे विभाग,पनवेल मध्ये एकत्रित (merge) होईल. | ज.व्य. उपविभाग,कर्जत<br>ज.व्य. उ.वि.क्र.३,पनवेल<br>उपविभाग, माणगांव<br>उपविभाग क्र.१, पनवेल<br>उपविभाग, महाड<br>उपविभाग, अलिबाग<br>उपविभाग, पेण | |
| ६) | रत्नागिरी | विभाग,रत्नागिरी | | उपविभाग,रत्नागिरी<br>उपविभाग,चिपळूण | |
| ७) | सिंधुदुर्ग | विभाग, सिंधुदूर्ग-नगरी | | उपविभाग,सावंतवाडी<br>उपविभाग,देवगड | |
| **प्रादेशिक विभाग, पुणे** | | | | | |
| ३.मंडळ, पुणे | | | | | |
| ८) | पुणे | विभाग,पुणे | विभाग क्र.१,पुणे हे विभाग,पुणे मध्ये एकत्रित (merge) होईल. | उपविभाग क्र.१,पुणे<br>उपविभाग,बारामती<br>उपविभाग,इंदापूर<br>उ.वि.क्र.४,पुणे(प्रव्यससे)<br>उ.वि.क्र.२,पुणे<br>ज.व्य.उ.वि.क्र.३,पुणे | |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९) | सातारा | विभाग,सातारा | विभाग,कराड हे विभाग,सातारा मध्ये एकत्रित (merge) होईल. | ज.व्य.उ.वि.क्र.१,सातारा<br>ज.व्य.उ.वि.क्र.२,सातारा<br>ज.व्य.उ.वि.क्र.३,सातारा<br>उपविभाग,फलटण<br>उपविभाग,कराड<br>उपविभाग,वडूज | उपविभाग क्र.२, कराड हे उपविभाग, -----मध्ये एकत्रित (merge) होईल. |
| ४.मंडळ, सांगली | | | | | |
| १०) | सांगली | विभाग,सांगली | | उपविभाग,इस्लामपूर<br>उ.वि.क्र.२,सांगली<br>उपविभाग,तासगांव<br>उपविभाग,विटा<br>उपविभाग,मिरज | |
| ११) | कोल्हापूर | विभाग,कोल्हापूर | | उ.वि.क्र.१,कोल्हापूर<br>उ.वि.क्र.२,कोल्हापूर<br>उ.वि.क्र.३,कोल्हापूर<br>उ.वि.क्र.६,कोल्हापूर<br>उपविभाग,इचलकरंजी<br>उपविभाग,गडहिंग्लज | उपविभाग क्र.५, कोल्हापूर हे उपविभाग,------ मध्ये एकत्रित (merge) होईल. |
| १२) | सोलापूर | विभाग,सोलापूर | | उ.वि.क्र.१,सोलापूर<br>उपविभाग,अकलूज<br>उपविभाग,बार्शी<br>उपविभाग,पंढरपूर<br>ज.व्य.उ.वि.सांगोला | उपविभाग क्र.२, सोलापूर हे उपविभाग,------ मध्ये एकत्रित (merge) होईल. |
| **प्रादेशिक विभाग, नाशिक** | | | | | |
| ५.मंडळ, नाशिक | | | | | |
| १३) | नाशिक | विभाग,नाशिक | ज.व्य.विभाग,नाशिक हे विभाग,नाशिक मध्ये एकत्रित (merge) होईल. | उपविभाग,नाशिक<br>उ.वि.क्र.४,मालेगांव<br>उपविभाग,मनमाड<br>उपविभाग,सिन्नर<br>ज.व्य.उ.वि.क्र.१,नाशिक<br>ज.व्य.उ.वि.क्र.३,नाशिक<br>ज.व्य.उ.वि.क्र.१,मालेगांव | |
| ६.मंडळ,जळगांव | | | | | |
| १४) | जळगांव | विभाग,जळगांव | | उपविभाग,जळगांव<br>उपविभाग,भुसावळ<br>उपविभाग,चोपडा<br>उपविभाग,एरंडोल | |
| १५) | धुळे | विभाग,धुळे | विभाग,धुळे नव्याने निर्मिती प्रस्तावित | उपविभाग,धुळे | |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६) | नंदुरबार | विभाग,नंदुरबार | विभाग,नंदुरबार नव्याने निर्मिती प्रस्तावित | उपविभाग,नंदुरबार<br>उपविभाग,अक्राणी | उपविभाग, अक्राणी नव्याने निर्मिती प्रस्तावित |
| ७.मंडळ, अहिल्यानगर | | | | | |
| १७) | अहिल्यानगर | विभाग,अहिल्या-नगर | विभाग,संगमनेर हे विभाग,अहिल्या-नगर मध्ये एकत्रित (merge) होईल. | उपविभाग,अहिल्यानगर<br>उपविभाग,नेवासा<br>उपविभाग,श्रीरामपूर<br>उपविभाग,संगमनेर<br>उपविभाग,कोपरगांव<br>उपविभाग,अकोले | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर** | | | | | |
| ८.मंडळ, छत्रपती संभाजीनगर | | | | | |
| १८) | छत्रपती संभाजीनगर | विभाग,छत्रपती संभाजीनगर | | उ.वि.१,छ.संभाजीनगर<br>उ.वि.२,छ.संभाजीनगर<br>उपविभाग,वैजापूर<br>उ.वि.३,छ.संभाजीनगर<br>उ.वि.४,छ.संभाजीनगर | |
| १९) | जालना | विभाग,जालना | | उ.वि.क्र.१,जालना<br>उपविभाग,परतुर<br>उ.वि.क्र.२,परतुर<br>उपविभाग,मंठा (सेलू येथून स्थलांतरीत) | |
| २०) | बीड | विभाग,बीड | | उपविभाग,बीड<br>उ.वि.क्र.२,बीड<br>उपविभाग,अंबेजोगाई | |
| ९.मंडळ, नांदेड | | | | | |
| २१) | नांदेड | विभाग,नांदेड | | उ.वि.क्र.१,नांदेड<br>उ.वि.क्र.२,नांदेड<br>उपविभाग,कंधार | |
| २२) | परभणी | विभाग,परभणी | | उपविभाग,परभणी | |
| २३) | हिंगोली | विभाग,हिंगोली | विभाग,हिंगोली नव्याने निर्मिती प्रस्तावित | उपविभाग,हिंगोली | |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०.मंडळ, लातूर | | | | | |
| २४) | लातूर | विभाग,लातूर | | उपविभाग,लातूर(रेणापूर)<br>उपविभाग,उदगीर<br>उपविभाग,अहमदपूर | |
| २५) | धाराशिव | विभाग,धाराशिव | | उपविभाग,धाराशिव<br>उ.वि.,तुळजापूर(कळंब)<br>उपविभाग,भुम | |
| **प्रादेशिक विभाग,अमरावती** | | | | | |
| ११.मंडळ, अमरावती | | | | | |
| २६) | अमरावती | विभाग,अमरावती | ज.व्य.वि.,अमरा वती विभाग,अमरावती मध्ये एकत्रित (merge) होईल. | उ.वि.क्र.१,अमरावती<br>उ.वि.क्र.२,अमरावती<br>उपविभाग,अचलपूर<br>उपविभाग,चांदुरबाजार<br>ज.व्य.उ.वि.१,अमरावती<br>ज.वय.उ.वि.२,अमरावती<br>ज.व्य.उ.वि.दर्यापूर<br>ज.व्य.उ.वि.अंजनगांव | ज.व्य.उ.वि.क्र.३, अमरावती हे उपविभाग,------ मध्ये एकत्रित (merge) होईल. |
| २७) | यवतमाळ | विभाग,यवतमाळ | | उपविभाग,यवतमाळ<br>ज.व्य.उ.वि.यवतमाळ<br>उपविभाग,पुसद | |
| १२.मंडळ, अकोला | | | | | |
| २८) | अकोला | विभाग,अकोला | | ज.व्य.उ.वि.अकोट<br>उपविभाग,मुर्तिजापूर<br>उपविभाग,अकोला | |
| २९) | बुलडाणा | विभाग,बुलडाणा | | उपविभाग,बुलडाणा<br>उपविभाग,खामगांव<br>उ.वि.देऊळगांव राजा (चिखली येथून स्थलांतरीत)<br>उ.वि.जळगांव जामोद | |
| ३०) | वाशिम | विभाग,वाशिम | | उपविभाग,वाशिम<br>ज.व्य.उ.वि.कारंजा | |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| प्रादेशिक विभाग, नागपूर | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३.मंडळ, नागपूर | | | | | |
| ३१) | नागपूर | विभाग,नागपूर | ज.व्य.वि.,नागपूर हे विभाग,नागपूर मध्ये एकत्रित (merge) होईल. | उ.वि.क्र.४,नागपूर<br>ज.व्य.उ.वि.नागपूर<br>उपविभाग क्र.१,नागपूर | उ.वि.क्र.२,नागपूर हे उपविभाग,------ मध्ये एकत्रित (merge) होईल. |
| ३२) | गोंदिया | विभाग,गोंदिया | | ज.व्य.उ.वि.१,गोंदिया<br>उपविभाग क्र.२,गोंदिया<br>ज.व्य.उ.वि.क्र.३,गोंदिया | |
| ३३) | भंडारा | विभाग,भंडारा | विभाग,भंडारा नव्याने निर्मिती प्रस्तावित | उपविभाग,भंडारा<br>उपविभाग,साकोली | |
| १४.मंडळ, चंद्रपूर | | | | | |
| ३४) | चंद्रपूर | विभाग,चंद्रपूर | | उ.वि.क्र.१,चंद्रपूर<br>उपविभाग,मूल<br>ज.व्य.उ.वि.३,बल्लारपूर | |
| ३५) | गडचिरोली | विभाग,गडचिरोली | विभाग, गडचिरोली नव्याने निर्मिती प्रस्तावित | उपविभाग,गडचिरोली | |
| ३६) | वर्धा | विभाग,वर्धा | | उपविभाग,वर्धा<br>ज.व्य.उ.वि.आर्वी<br>(वर्धा येथून स्थलांतरीत) | |
| एकूण | | ३४ | | १२७ | |

आकृतीबंधामध्ये विभागीय कार्यालये ३७ व उपविभागीय कार्यालये १२८ आहेत. तथापि प्रत्यक्षात उपविभागीय कार्यालये १३१ कार्यरत आहेत. यास्तव आकृतीबंधाच्या मर्यादंत व प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी विभाग प्रस्तावित करुन वरील परिच्छेद ०३ मध्ये नमूद केल्यानुसार सुधारीत रचना प्रस्तावित करण्यात येत आहे. यामुळे धुळे, नंदुरबार, हिंगोली, भंडारा व गडचिरोली या जिल्हयाच्या ठिकाणी नवीन विभाग तयार होत आहेत. तसेच नंदुरबार विभागांतर्गत उपविभाग, अक्राणी नव्याने निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

४. सुधारीत रचनेनुसार ३४ विभागीय कार्यालये येतात, तथापि आकृतीबंधानुसार ३७ विभागीय कार्यालये मंजूर असल्याने ०३ विभागीय कार्यालये अनुक्रमे जलव्यवस्थापन यासाठी किंवा मोठ्या योजनांसाठी (उदा.छत्रपती संभाजीनगर शहर पाणी पुरवठा इ.) देण्याबाबत सदस्य सचिव स्तरावर निर्णय घेणे योग्य होईल. त्याचप्रमाणे प्रस्तावित १२७ उपविभाग आहेत तथापि आकृतीबंधानलुसार १२८ उपविभाग मंजूर आहेत. यास्तव सदर ०१ उपविभाग देखील कामाच्या निकडीनुसार सदस्य सचिव स्तरावर निर्णय घेण्यात यावा.

**ठराव :-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या क्षेत्रिय कार्यालयांची रचना सुधारीत करणेबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त कार्यक्रम बाब पुढे ढकलण्यात (Defered) आली.

उपस्थितांचे आभार मानून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १६० बैठक संपन्न झाली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.